MAHMARI 19358/13/1/2000 - TC

विद्या प्रसारक मंडळ
स्थापना • नौपाडा ठाणे • १९३५

व्ही.पी.एम्.
# दिशा

वर्ष चोविसावे/ अंक ७/ जुलै २०२३

## संपादकीय

### भारताची अंतरिक्ष झेप

१४ जुलैला दुपारी लाखो भारतीय टेलिव्हिजन प्रसारण किंवा यूट्यूबवरील प्रसारण पाहण्यात गुंग होते. याचे कारण त्या वेळी भारताचे चंद्रयान अंतराळात झेपावणार होते. त्यांना या ऐतिहासिक क्षणाचे साक्षीदार व्हायचे होते. अग्निबाण सुरू होण्याच्या अर्धा तास आधीच प्रक्षेपण सुरू करण्यात आले. या कालावधीत चंद्रयान मोहिमेची आणि ती पूर्ण करण्यासाठी आपल्या तंत्रज्ञांनी केलेल्या तयारीची माहिती देण्यात आली. ठरलेल्या वेळेला अग्निबाणातील इंधन पेटू लागले आणि अग्निबाण आकाशाकडे झेपावले. सगळ्या गोष्टी ठरल्याप्रमाणे घडत गेल्या आणि चंद्रयान इतर घटकांपासून वेगळे झाले. त्याला चंद्रापर्यंत पोहोचायला तब्बल ४० दिवस लागतील. पण पहिल्या १५ मिनिटात जे काही घडले ते पाहून या मोहिमेत सहभागी असलेल्या सर्व शास्त्रज्ञ आणि तंत्रज्ञांच्या चेहऱ्यावर स्मित झळकले. मोहिमेचा पहिला टप्पा यशस्वी झाल्याबद्दल प्रत्येक जण एकमेकांचे अभिनंदन करू लागले.

चंद्रावर यान पाठविणे हे काही सोपे काम नाही. अनेक प्रयत्नांनंतर अमेरिकेला या कामात यश मिळाले. त्यांच्या पावलावर पाऊल टाकत रशियाने देखील चंद्रमोहीम यशस्वी करून दाखवली. त्यानंतर क्रम लागला तो चीनचा. चंद्रावर यान पाठविणारा भारत हा चौथा देश आहे. १४ जुलैची मोहीम ही भारताची तिसरी मोहीम होती. पहिली मोहीम (ज्याला चंद्रयान १ असे नाव दिले होते) १५ वर्षांपूर्वी म्हणजे २००८ मध्ये घेण्यात आली होती. चंद्रयान २ मोहीम २०१९ मध्ये राबविण्यात आली होती. या मोहीमेत चंद्राच्या पृष्ठभागावर लँडर उतरविण्याची योजना होती. ती मात्र यशस्वी झाली नाही. त्यावेळी आलेल्या अपयशाची कारणमिमांसा शोधून आणि त्यावर उपाययोजना करून चंद्रयान ३ ही मोहीम आखली गेली होती.

आज आपण अंतरिक्ष विज्ञानात जी झेप घेतली आहे तिची सुरुवात १९६१ मध्ये झाली. स्वातंत्र्यानंतर भारताने अणुऊर्जेच्या क्षेत्रात पाऊल टाकले. ६० चे दशक येईपर्यंत आपण त्या क्षेत्रात चांगलीच प्रगती केली होती. त्याचवेळेस भारतीय शास्त्रज्ञांना अंतरिक्ष खुणावू लागले. त्या वेळच्या राज्यकर्त्यांनी या कामाला उत्तेजन दिले. त्यानुसार १९६१ मध्ये अणुऊर्जा आयोगाचा एक भाग म्हणून अंतरिक्ष विभाग सुरू करण्यात आला. त्याची जबाबदारी अर्थातच होमी भाभा यांच्याकडे होती. १९६२ मध्ये त्यांनी अंतरिक्ष संशोधनासाठी एक समिती स्थापन केली आणि त्यांचे अध्यक्ष पद विक्रम साराभाई यांना दिले. १९६६ मध्ये होमी भाभा यांचे विमान अपघातात निधन झाले. त्यानंतर अणुऊर्जा आणि अवकाश संशोधन यांचे पुढारपण विक्रम साराभाई यांच्याकडे आले. त्यांच्या

(पृष्ठ क्र. २ वर)

(मुखपृष्ठावरून - **संपादकीय**)


प्रयत्नांनेच १९६९ मध्ये भारतीय अंतरिक्ष संशोधन संस्था स्थापन करण्यात आली. त्यानंतर दोनच वर्षांत त्यांचे निधन झाले. परंतु मिळालेल्या अल्पकाळात त्यांनी अंतरिक्ष संशोधनाची दिशा आखून दिली आणि त्या वाटेने जाणाऱ्या शास्त्रज्ञांची एक फळी तयार केली.

१९७५ मध्ये केलेले आर्यभट्ट या उपग्रहाचे उड्डाण हे भारतीय अंतरिक्ष आयोगाचे पहिले यश म्हणता येईल. त्यानंतर भास्कर १ आणि भास्कर २ असे उपग्रह अवकाशात सोडण्यात भारतीय अवकाश संशोधन संस्थेला यश मिळाले. युरोपियन अंतरिक्ष विभागाच्या मदतीने ॲपल नावाचा उपग्रह १९८१ मध्ये अवकाशात सोडला गेला. इन्सऍट उपग्रहाची निर्मिती आणि उड्डाण या कामगिरीमुळे भारताचे नाव या क्षेत्रात सन्मानाने घेण्यात येऊ लागले. इन्सॅट १ अ हा उपग्रह १९८२ मध्ये फ्रेंच अंतरिक्ष विभागाच्या मदतीने उडविण्यात आला. त्यानंतर अग्निबाणाची निर्मिती करून आपल्या क्षमतेवर आपण हा उपग्रह त्यांच्या कक्षेत पाठवू लागलो. इन्सॅट हा भूस्थिर कक्षेत सोडलेला उपग्रह आहे. त्याचे वैशिष्ट्य हे की, तो सतत आपल्या देशावरच राहतो आणि हवामानाचा अंदाज, दूरलक्षी चित्रण आणि संदेशवहन अशी तीन कामे एकाचवेळी करतो. याचा फायदा आपल्या देशाला चांगलाच झाला आहे. एखादे धरण फुटले किंवा पिकाला कीड लागली तर या उपग्रहाकडून त्याचे छायाचित्र लगेच प्राप्त होते. आकाशात असलेल्या ढगांचे चित्रण करून उपग्रह आपल्याला नियमितपणे पाठवित असते. त्यामुळे आपल्याला हवामानाचा अचूक अंदाज करणे शक्य झाले आहे. त्याचा फायदा असा झाला की, आपण जीवितहानी आणि वित्तहानी मोठ्या प्रमाणावर कमी करू शकलो. इन्सॅट उपग्रहाचा सर्वसामान्य माणसाला लक्षात येणारा उपयोग म्हणजे संदेशवहन. आपल्या देशात दूरचित्रवाणी सर्वत्र पसरली आहे. त्यावर दिसणाऱ्या वाहिन्यांची संख्या अमाप आहे. हे सगळे इन्सॅट या उपग्रहामुळेच शक्य झाले.

इन्सॅटच्या यशानंतर आपल्या तंत्रज्ञांनी अवकाशातील ग्रहांवर आणि उपग्रहांवर आपले लक्ष केंद्रित केले. चंद्र हा आपल्या पृथ्वीचा उपग्रह असून अवकाशात असलेली सगळ्यात जवळची वस्तू आहे. म्हणून २१ व्या शतकाच्या सुरुवातीस चंद्रावर स्वारी करण्याची योजना आखण्यात आली. दोन स्वाऱ्या आधीच झाल्या. या महिन्यात केलेला हा तिसरा प्रयत्न होता. म्हणूनच या मोहिमेला चंद्रयान-३ असे नाव दिले होते. १४ जुलै २०२३ रोजी सोडलेले यान चंद्रावर पोहोचायला तब्बल ४० दिवसांचा कालावधी लागणार आहे. या मोहिमेचे तीन भाग आहेत. पहिला भाग चंद्राभोवती फिरणाऱ्या ऑर्बिटरचा, दुसरा भाग चंद्रावर उतरणाऱ्या लँडरचा आणि तिसरा भाग चंद्राच्या पृष्ठभागावर भ्रमण करणाऱ्या रोव्हरचा. यातील प्रत्येक भागात लहान-लहान यंत्रे आहेत. रोव्हर आणि लँडर चंद्राच्या दक्षिण भागात उतरणार आहेत. यांना काही कामे नेमून दिलेली आहेत. ती कामे जर त्यांनी चोखपणे पूर्ण केली तर चंद्राबद्दलच्या आपल्या ज्ञानात चांगलीच भर पडणार आहे. हे करण्यासाठी या यंत्रांना केवळ १४ दिवसांचा कालावधी मिळणार आहे. याचे कारण चंद्रावरचा एक दिवस हा पृथ्वीवरच्या १४ दिवसांएवढा असतो. त्यानंतर चंद्राचा हा भाग अंधारात जाईल.

भारतीय अंतरिक्ष आयोगाचे मागील सहा दशकांत मिळविलेले यश अतुलनीय असेच आहे. लहान लहान यंत्रापासून सुरुवात करून मंगळावर यान पाठवू शकेल एवढ्या क्षमतेचे अग्निबाण बनविण्याची क्षमता या संस्थेने विकसित केली. केवळ आपलेच नाही तर इतर देशांचे उपग्रह आपण अतिशय कमी शुल्क आकारून उडवून देऊ लागलो. आज अंतरिक्ष संशोधनाच्या भारताचे नाव उच्च स्थानावर आहे. या यशात भारतातील अनेक संशोधन संस्थांचा सहभाग आहे. शासकीय संस्थांप्रमाणेच खाजगी संस्थांनी देखील या कामात आपला भार उचलला आहे. अंतरिक्ष संशोधनात आपल्या देशात खूप वाव आहे. याची दखल पुढच्या पिढीने घेण्याची गरज आहे. होतकरू आणि नवनिर्मितीची क्षमता असणाऱ्या तरुणांनी अवकाश संशोधनाची वाट चोखाळावी असे सुचवावेसे वाटते.

**- डॉ. सुधाकर आगरकर**



# व्ही.पी.एम्. दिशा


**वर्ष चोविसावे/अंक ७/जुलै २०२३**



**संपादक**
डॉ. विजय बेडेकर

'दिशा' प्रारंभ जुलै १९९६
(वर्ष २८ वे/अंक १ ला)



**कार्यालय/पत्रव्यवहार**
विद्या प्रसारक मंडळ
डॉ. बेडेकर विद्या मंदिर
नौपाडा, ठाणे – ४०० ६०२
**दूरध्वनी : २५४२ ६२७०**
**www.vpmthane.org**
**vpmt1935@gmail.com**



**मुद्रणस्थळ :**
परफेक्ट प्रिण्टस्,
नूरीबाबा दर्गा रोड, ठाणे.
**दूरध्वनी : २५३४ १२९१**
**२५४१ ३५४६**
**Email:perfectprints@gmail.com**


## *अनुक्रमणिका*


| | | | |
|---|---|---|---|
| १) | संपादकीय | डॉ. सुधाकर आगरकर | |
| २) | महाकवी कालिदासाचे मेघदूत | डॉ. गौरी माहुलीकर | ३ |
| ३) | कचारगडची गुफा | दिलीप नारायण वंडलकर | ९ |
| ४) | उत्तम कविता कशी असते ? | डॉ. आनंद कुलकर्णी | ११ |
| ५) | अनुबंध | चन्द्रशेखर टिळक | १४ |
| ६) | आमची अंदमान आनंद यात्रा | कु. जान्हवी महेश बेडेकर | १६ |
| ७) | अटल बोगदा : एक यशोगाथा | डॉ. सुधाकर आगरकर | २१ |
| ८) | नमो सदा श्री नृसिंहसरस्वती महाराज (भाग – १) | सहा. प्रा. सुभाष गं. शिंदे | २३ |
| ९) | परिसर वार्ता | संकलित | २८ |



या अंकात व्यक्त झालेली मते त्या लेखकांची वैयक्तिक मते असून, त्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

# व्ही. पी. एम. 'दिशा'च्या संदर्भात

- आपण 'दिशा' नियमित वाचा. इतरांनाही वाचायला सांगा.
- हे व्यासपीठ **अभ्यासपूर्ण लेखांसाठी** आहे.
- शैक्षणिक संस्थेने असे मासिक चालवावे, याचे हे एकमेव उदाहरण आहे.
- आपण विचारप्रवृत्त लेख पाठवून 'दिशा'ला सहकार्य करू शकता.
- आपण स्वत: देणगी मूल्य देऊ शकता व इतरांना सांगा.
- आपले देणगी मूल्य द्यायचे राहिले नाही ना, कृपया पडताळून पाहा.
- दिशाच्या संदर्भात देणगी मूल्य, लेख पाठवावयाचे असतील तर ते कार्यवाह, विद्या प्रसारक मंडळ, डॉ. बेडेकर विद्या मंदिर, नौपाडा, ठाणे - ४००६०२ या पत्त्यावर पाठवा. ०२२-२५४२६२७० या क्रमांकावर संपर्क साधा.
  **Email : vpmt1935@gmail.com**
- आपण सार्वजनिक ग्रंथालयाचे संचालक असाल वा असे एखादे ग्रंथालय चालवत असाल, तर आपण सभासद होणे अत्यंत गरजेचे आहे. महाविद्यालये, शाळा यांच्या प्रमुखांनीही आपल्या संस्थेकडून देणगीमूल्य पाठवावे.
- www.vpmthane.org या संकेतस्थळावर 'दिशा'चे जुने अंक आपण पाहू शकता.
- वार्षिक देणगी मूल्याचा रु. ५००/- चा धनादेश 'विद्या प्रसारक मंडळ' या नावाने पाठवावा.
- कृपया वर्गणीदार व्हावे.

- संपादक

# महाकवी कालिदासाचे मेघदूत

*आषाढ महिन्याचा पहिला दिवस दिनांक १९ जून रोजी 'महाकवी कालिदास दिवस' म्हणून जगभर साजरा केला जातो. त्यानिमित्ताने ज्येष्ठ संस्कृत विदुषी डॉ. गौरी माउलीकर यांचा 'मेघदूता' वरील लेख खास दिशाच्या वाचकांसाठी - संपादक*

'वाक्यं रसात्मकं काव्यम्' या काव्यलक्षणाचा पदोपदी (प्रत्येक पदात) अनुभव घ्यावयाचा असेल तर कालिदासाचे मेघदूत हे १२० श्लोकांचे चिमुकले खंडकाव्य वाचण्याला पर्याय नाही. कवीची सौंदर्यग्राही दृष्टी, सूक्ष्म अवलोकनशक्ती, निसर्ग व मानवाच्या नात्यातले विविध पदर, अचेतन वस्तूंचे मानवीकरण, रसाविष्कार आणि भावाभिव्यक्ती या सर्व निकषांवर मेघदूत शतकानुशतके रसिक मनावर अधिराज्य गाजवीत आहे. कालातीत टवटवीतपणा हा ह्या भावकाव्याचा गाभा आहे. कुणी एक यक्ष, त्याच्या हातून एक आगळीक घडते, त्याला पत्नीवियोगाचा शाप मिळतो, एवढ्याच कथानकाला काव्यात्म परिमाण लाभले, एक अनोखे प्रतिभासंपन्न वळण मिळाले आणि पतिपत्नीच्या एकनिष्ठ प्रेमाला वैश्विक कोंदण मिळाले. ४० हून अधिक संस्कृत टीका, अनेकानेक भारतीय व पाश्चात्त्य भाषांत अनुवाद, नृत्य, नाट्य, गीत, चित्र, शिल्प इत्यादी कलांच्या माधमांतून आविष्कार अशा सर्वांगीण सहजाभिव्यक्तीने समृद्ध व परिपूर्ण असे हे मेघदूत समीक्षकांनाही 'मेघे माघे गतं वयः' म्हणावयास लावते. साहित्याच्या सर्व अंगांना स्पर्श करणारे हे काव्य अंतः करणाला भिडते, बुद्धीबरोबर हृदयस्थ भावनांनाही साद घालते असा सर्वांचा अनुभव आहे. कृष्णशास्त्री चिपळूणकर, भालचंद्र देशमुख, चिंतामणराव देशमुख, शांताबाई शेळके, कविवर्य कुसुमाग्रज, वसंत बापट ह्यांसारख्या सिद्धहस्त लेखकांना या काव्याने मोहिनी घातली ती का आणि आजही मेघदूताच्या वाचनाने, केवळ स्मरणानेही पापण्या ओलावतात ते का हे तपासायला हवे.



कोणत्याही काव्याच्या समीक्षेचे अनेक निकष आहेत. ध्वनी, रस, अलंकार, गुण, रीती, वक्रोक्ती, औचित्य इत्यादी. लावण्यवती स्त्रीचे लावण्य नक्की कशात आहे हे जसे सांगता येत नाही, त्याचप्रमाणे मेघदूताची मोहिनी काव्यशास्त्राच्या वरीलपैकी कोणत्या निकषाने पडते ते ठरविता येत नाही म्हणून या लेखापुरती आनंदमीमांसा करणेच इष्ट. मेघदूतातील नितांत रमणीय निसर्गसौंदर्य, कालिदासाचे मधुस्रावी शब्द, रसस्यन्दी भाषा, शृंगारातील मनोहर विभ्रम आणि उन्नत उदात्त विचार या साऱ्या सरंजामाची ही अजब मोहिनी आहे. काही ठिकाणी हा आनंद ऐंद्रिय, शारीर स्तरावरचा आहे, क्वचित् काव्यात्म पातळीवरचा, तर कधी अलौकिक. क्रमाक्रमाने चढत्या भाजणीत हा आनंद रसिक वाचक अनुभवू शकतो.

**१) शारीर स्तरः –** मेघदूताचा आरंभबिंदूच ह्या स्तरापाशी आहे. पहाटे पहाटे प्रियेच्या रेशीम मिठीतून स्वदिठी सोडविणे अशक्य झाल्याने कुणी यक्ष प्रमाद करतो आणि त्यामुळेच त्याला एक वर्षाचा असह्य विरह सहन करावा लागतो. संपूर्ण मेघदूताला ह्याप्रकारे विप्रलंभ

आपण परिस्थितीला शरण जाता कामा नये; परिस्थिती आपल्याला शरण गेली पाहिजे !


शृंगाराची झालर आहे, जी करुणेच्या आडून सहृदय वाचकाला अनुभूत आनंदाचा भागीदार बनविते. पावसाच्या सरींवर सरी कोसळताहेत, जीवाला एक अनामिक हुरहूर लागतेय आणि ह्या वेळेस जर आलिंगनक्षम व्यक्ती जवळ नसेल तर? सुखी माणसाचे मनही अशावेळी कातर, हळूवार होते; मग 'कण्ठाश्लेषप्रणयिनि जने किं पुनर्दूरसंस्थे', विरही यक्षाची काय बरे अवस्था झाली असेल? 'नभ मेघांनी आक्रमिले' असता, धरित्रीच्या हिरव्यागार शालूवर शुभ्रधवल भूच्छत्रे फुलली असता, कुड्याच्या व कदंबाच्या फुलांनी गंधित झुळुक वाहत असता आणि मोरांच्या केकांनी आसमंत भरला असता सुखी अथवा दुःखी (सर्व) माणसाचे मन आर्द्र होते असे विरागी भर्तृहरी सुद्धा लिहितो. धीरोदात्त रामही वर्षाऋतूत सीतेच्या विरहात व्याकुळ झाला व लक्ष्मणास म्हणाला, ''अहं तु हृतदारश्च राज्याच्च महतश्च्युतः। नदीकूलमिव क्लिन्नमवसीदामि लक्ष्मण।।'' पावसाने भल्याभल्यांची भंबेरी उडविली, मग, यक्षाचा काय पाड? यक्ष यक्षिणी मुळातच प्रणयासक्त युगुल मानले जाते. कुबेराच्या संपन्न नगरीतील हे जीव नित्य मदनाधीन असतात. ते स्फटिक गृहात, मंदाकिनीच्या शीतल तुषारांनी युक्त वायूचा आस्वाद घेत, कल्पतरुखातळी मधुमधुर रतिसुख अनुभवतात, कटिवस्त्राला हात घातला की त्यांच्या मादक स्त्रिया, केशराच्या चूर्णाने रत्नदीप मालविण्याचा वृथा प्रयत्न करतात, रतिसुखाने आलेल्या ग्लानीचा परिहार चंद्रकांत मण्यातून पाझरणाऱ्या जलबिंदूंनी करतात (उत्तरमेघ. ५-९) अशी शारीर पातळीवरील उद्दीपक वर्णने कालिदास करतो तेव्हा तो निस्संशय शृंगाररसाचा उद्गाता म्हणून रसिकांसमोर येतो.

'कामार्ता हि प्रकृतिकृपणा चेतनाचेतनेषु' असे सांगत अचेतनाचे मानवीकरण कालिदास करतो ते अत्यंत मनोरम आहे. अचेतन मेघ आणि जीवनदायिनी नद्या यांच्यावर प्रियकर प्रेयसीचे रूपक करणे हे संस्कृत साहित्यिकांना नेहेमीचे आहे; परंतु कालिदासाचे वैशिष्ट्य त्याच्या मांडणीत आहे, प्रणयातील नजाकतीत आहे. नायिकेचे जे काही प्रकार संस्कृत साहित्यिकांना माहीत आहेत, त्यातील प्रायः सर्व नायिका मेघाच्या प्रेयसीच्या रूपात वाचकाला भेटतात. आम्रकूटाजवळ (अमरकंटक) रेवा (नर्मदा) अवखळ आहे. तिच्या मूळ प्रवाहाला असंख्य जलप्रवाह मिळतात, ती आम्रकूटाच्या चहूबाजूंनी वहात जाते. आकाशातून भ्रमण करणारा मेघ तिचा हा अवखळपणा कौतुकाने पाहतो. पुढे ती तरुण होते, तिचे पात्र विशाल होते, वन्य हत्तींच्या क्रीडेने, त्यांच्या मदस्रावाने ती गंधित होते तेव्हा मेघ तिचा आस्वाद घेतो. (पूर्वमेघ.१९,२०) एखाद्या जाणत्या प्रियकराने नवोढा मुग्धेला हळूहळू फुलू द्यावे आणि नंतर तिचा उपभोग घ्यावा अशी मखमली प्रीत इथे दिसते.

प्रसिद्ध विदिशा नगरीत गेल्यावर मेघाला भेटते एक अल्लड युवती वेत्रवती. हिच्या प्रवाहातील तरंग म्हणजे जणू तिच्या ताणलेल्या भुवया. ती वरवर मेघाला प्रतिबंध करतेय, पण मनातून त्याच्या चुंबनासाठी आसुसली आहे. मेघ तर कामक्रीडेत कुशल, तो तिच्या तीरावर जरा गडगडाट करतो आणि झटक्यात मुखास्वाद घेतो. तीरोपान्तस्तनितसुभगं पास्यसि स्वादु यस्मात्सभ्रूभङ्गं मुखमिव पयो वेत्रवत्याश्चलोर्मि।। (२५) मल्लीनाथाने यावर भाष्य केले, 'कामिनीनामधरास्वादः सुरतादतिरिच्यते'। प्रत्यक्ष मीलनापेक्षा चुंबन अधिक श्रेष्ठ ठरते.

पुढे मेघाच्या मार्गात येते ती निर्विन्ध्या. ही अनुभवी आहे. प्रेमाचे रंग ढंग ती जाणते, प्रियकराला आकृष्ट करण्याचे विभ्रम तिला ठाऊक आहेत. तिच्या प्रवाहात किलबिलणारी विहंगमाला जणू तिची किणकिणणारी मेखला. तर ह्या मेखलेचा नाद करीत, आवर्तरूपी (नदीतील भोवरा) नाभी दाखवीत ती अडखळत चालते आहे, मेघाला आव्हान देत वाहत आहे जणू एखादी

मदालसाच. स्वाभाविकच मेघ हा मोह टाळू शकत नाही. इथे कालिदास जाता जाता एक सुंदर अर्थांतरन्यास लिहून जातो. 'स्त्रीणामाद्यं प्रणयवचनं विभ्रमो हि प्रियेषु।(पूर्वमेघ.२९) प्रेम व्यक्त करण्याचा स्त्रियांचा मार्ग म्हणजे लाडिक विभ्रम होत. निर्विन्ध्या अडखळतेय कारण तिचा प्रवाह क्षीण झाला आहे, मेघाच्या विरहात ती कृश झाली आहे, विरहाने ती पांढरीफटक (तिच्या तीरावर जीर्ण पाने पडली आहेत) पडली आहे. यक्षाची पत्नी जशी त्याच्या विरहाने दीन झाली आहे, तद्वत निर्विन्ध्या दीन झाली आहे आणि म्हणूनच ती मेघाला आकृष्ट करण्यासाठी धडपडते आहे' असे टीकाकार सांगतात.




गंभीरा ही नावाला साजेशी प्रौढा आहे, उदात्तनायिका आहे, शफर नावाच्या रुपेरी मासोळ्यांच्या रूपाने ती मेघाकडे प्रणयकटाक्ष टाकते. नुकताच ग्रीष्म संपल्याने तिचा प्रवाह आटला आहे. कटिवरून सरकलेले जलवस्त्र ती प्रवाहात पडलेल्या बांबूंच्या शाखाहस्तांनी धरून ठेवण्याचा वृथा यत्न करीत आहे तरीही तिचे दोन्ही तट (नितंब) उघडे पडले आहेत, असे असता, ज्ञातास्वादो विवृतजघनां को विहातुं समर्थः (पूर्वमेघ. ४४) ज्याने रतिसुखाचा आस्वाद घेतला आहे, असा अनुभवी मेघ तिला टाळून पुढे कसा बरे जाईल?

पुढे ब्रह्मावर्तात प्रवेश केल्यानंतर सरस्वती नदी लागते, आणि त्यानंतर गंगा, सुरनदी. मेघाचे नाते यांच्याशीही पति प्रियकराचेच आहे; मात्र आता कालिदासाच्या शैलीत भाषेत निव्वळ वासना, कामना नाही तर परिणत प्रेमाची गाढ तृप्ती जाणवते. सरस्वतीचे पान करून मेघ आंतरिक शुद्धी अनुभवतो (पूर्वमेघ. ५२), तर काळ्याकभिन्न सुरगजाप्रमाणे गंगेवर ओणवे होताना, तिचे स्फटिकासारखे निर्मळ जल पिताना त्याची सावली तिच्या प्रवाहात पडल्याने गंगेचा यमुनेशी अस्थानी संगम तर झाला नाही ना अशी शंका येते. (पूर्वमेघ.५४)

अचेतन मेघ आणि सचेतन स्त्री असाही प्रेमभाव कालिदासाने रंगविला आहे. उज्जयिनीच्या सौंदर्याभिमानी वारांगना चामरनृत्य करून थकतील तेव्हा मेघाने शीतल जलबिंदूंचा जरासा शिडकावा करताच त्या कशा आश्वस्त होतील आणि धन्यवाद देण्याकरिता मेघाकडे काजळभरले दीर्घकटाक्ष टाकतील असे रंजक चित्र कालिदास रेखाटतो. (पूर्वमेघ. ३८) कामिनींच्या ह्या रूपदर्शनाचा लाभ मेघाला अनायास होईल असे सांगून यक्ष त्याला उज्जयिनीला जाण्यासाठी अजून एक कारण देतो. या सर्व प्रकारच्या शारीर स्तरावरच्या आनंदाचे वर्णन करताना कटी, नीवी, अधरास्वाद, चुंबनालिंगनादी कामव्यापारांचे उल्लेखही पदोपदी येतात आणि कालिदासाच्या कामशास्त्राच्या ज्ञानाची ग्वाही देतात.

**२) काव्यात्म आनंद :** वैदर्भी शैलीत अत्यंत रसाळपणे निसर्गाचे वर्णन करताना कवी हातचे काही राखून ठेवीत नाही अनंतहस्ते कवीने देता दो करांनी किती घ्यावे असा प्रश्न पडतो. काव्याशास्त्रातील रस ध्वनी, गुण अलंकारांनी काय किमया केली आहे ते पाहू या. आषाढस्य प्रथमदिवसे मेघमाश्लिष्टसानुं वप्रक्रीडा परिणतगजप्रेक्षणीयं ददर्श (पूर्वमेघ. २) एखाद्या बलाढ्य हत्तीप्रमाणे दिसणारा आषाढातील मेघ (म्हणजेच तो

पाण्याने भरलेला काळा मेघ आहे) रामगिरीला, त्याच्या शिखराला धडकतो आहे, ढुशा मारतोय जसा हत्ती किल्ल्याच्या तटबंदीला. मनःचक्षूसमोर कुंचल्याविना केवळ शब्दांनी चित्र उभं करण्याची कालिदासाची हातोटी विलक्षण आहे. ह्या मेघाला अवचित आलेला पाहून विरही यक्षाला त्याचे कौतुक वाटते अवघ्या सृष्टीची सृजनोत्सुकता पाहून तो व्याकुळ होतो आणि कुड्याच्या फुलांची ओंजळ देऊन त्याचे स्वागत करतो. मेघाला आकाशात पाहून प्रोषितभर्तृका (पति दूरदेशी गेलेल्या स्त्रिया) न विंचरलेल्या केसांच्या गालावर आलेल्या चुकार बटा दूर सारून (उद्गृहीतालकान्ताः) मोठ्या आशेने व विश्वासाने त्याकडे पाहतात आणि मनोमन सुखावतात की, पावसाळा सुरू झाला म्हणजे त्यांचे पति प्रियकर परततील. यातील ध्वनी सहृदयसंवेद्य आहे. संपर्काची कोणतीही साधने उपलब्ध नसता, केवळ काळ्या ढगाच्या दर्शनाने आनंदित होणाऱ्या पथिकवनितांचा निरागसपणा, आशेच्या हिंदोळ्यावर झुलणारे त्यांचे मन, उचंबळून येणारी प्रेमभावना य सर्व गोष्टी कशा स्वाभाविक वाटतात, आणि यावर कडी केली आहे एका अर्थान्तरन्यासाने. आशाबन्धः कुसुमसदृशं प्रायशो ह्यङ्गनानां सद्यः पाति प्रणयि हृदयं विप्रयोगे रुणद्धि (पूर्वमेघ.९) आशेचा लवचिक तंतू आहे म्हणून विरहातही या स्त्रिया जगतात, अन्यथा त्यांची कुसुमपेलव हृदये कधीच भग्न झाली असती.

काळ्या मेघाच्या जोडीने शुभ्र बलाकमाला विहरते हे दृष्य केवळ सौंदर्यग्राही नाही, तर त्यांच्या पारस्परिक स्नेहाचे द्योतक आहे. राजहंसही मेघासोबत पुन्हा एकदा आपल्या मूळ निवासाप्रत मानसाकडे कूच करतात, प्रवासात एकटे वाटू नये म्हणून सोबत करतात असे कवी लिहितो. अचेतन मेघाला एकदा भाऊ मानले म्हटल्यावर त्याची काळजी घेणे ओघानेच आले नाही का? श्याम कृष्ण रंगीत मोरपिसांनी शोभतो, तद्वत श्याम मेघ इंद्रधनुष्याच्या रंगांनी. हे इंद्रधनुष्य कोणते तर वारुळातील नागांच्या फण्यावरील मण्यांतून बाहेर पडणाऱ्या किरणांनी तयार झालेले. (पूर्वमेघ १५) कल्पनाविलास कसा आणि किती याला काही सीमा?

आम्रकूट पर्वत नावाला साजेसा काननाम्रांनी (गावठी, वन्य आंबे) भरलेला, त्या पिकलेल्या आंब्यांमुळे त्याचा विस्तार फिकट पिवळसर झाला आहे, त्याच्या उंच शिखरावर हा काळाकुळकुळीत मेघ विसावला आहे, हे दृश्य कालिदासाच्या नजरेला कसे दिसते तर मध्ये श्यामः स्तन इव भुवः शेषविस्तारपाण्डुः आम्रकूट जणू धरणीमातेचा उघडा स्तनच होय. मुळात आंब्यांनी किंचित् गौर झालेला स्तन आणि स्तनाग्राच्या स्थानी विराजमान झालेला काळा मेघ ही कल्पनाच अद्भुत आहे. स्तन्य पाजल्याने बालकाचे पोषण होते, त्याचप्रमाणे काळ्या मेघातून झरणाऱ्या पाण्याने लोकांचे पोषण होणार आहे हा जीवनदायक संदेशही यातून व्यक्त होतो. 'उपमा कालिदासस्य' अशी साधारण मान्यता आहे, परंतु मेघदूतात कल्पनेच्या भरारीने ज्या उत्प्रेक्षा कालिदास रचतो त्या लाजबाब आहेत.

सारङ्गास्ते जललवमुचः सूचयिष्यन्ति मार्गम् (पूर्वमेघ.२१) या श्लोकात श्लेषामुळे निर्माण झालेले भिन्न अर्थ खूप मनोहर आहेत. 'सारङ्गश्र्चातके भृङ्गे कुरङ्गे च मतङ्गजे' असे सारंग शब्दाचे वेगवेगळे अर्थ सांगितले आहेत. ज्याचे अंग चित्रयुक्त आणि मनोहर आहे तो सारंग म्हणजे मोर अथवा हरीण, सार म्हणजे मधुर गायन करतो तो सारंग म्हणजे भुंगा, सार म्हणजे जल देहि अशी याचना करतो तो सारंग म्हणजे चातक पक्षी, (हा अर्थ दुर्गाबाई भागवतांनी त्यांच्या कदंब या पुस्तकात दिला आहे) सार म्हणजे पाणी, त्याच्या जवळ जातो, रमतो तो सारंग म्हणजे हत्ती असे विविध अर्थ पाहताना मिळणारा काव्यमय आनंद विरळा. कालिदास सामान्यतः अर्थालंकार वापरतो, शब्दालंकार

गवताची दोरी वळली म्हणजे तिने मत्त हत्तीसुद्धा बांधला जातो !

नाही, तरी या ठिकाणी श्लेषजन्य अर्थाची रमणीयता न्यारी आहे.

कैलासाच्या शिखरावर विराजमान काळा मेघ, याचे वर्णन करताना कालिदास कल्पना करतो की, मुळात हिमधवल कैलास हा शिवाने तांडवनृत्यप्रसंगी केलेल्या अट्टहासामुळे (मोठ्या हसण्याने) पांढरा झाला (मल्लीनाथ लिहितो, 'हासादीनां धावल्यं कविसमयसिद्धम्') आणि त्याच्या टोकावर बसलेला काळा मेघ म्हणजे शंकराच्या नंदीने खेळ करत उकरलेल्या मातीचा जणू गोळाच. (पूर्वमेघ.६१) आरंभी व प्रक्रीडेचा उल्लेख आला आहे, शिंगांनी अथवा दातांनी उकरण्याची आणि धडक देण्याची सवय हत्ती, बैल, रेडा यांना असते असे मल्लीनाथ म्हणतो.




उत्तरमेघात यक्षाने स्वतःच्या घराचे केलेले वर्णन तर चलच्चित्रासमान आहे. (उत्तरमेघ. १५-२०) कुबेराच्या प्रासादाच्या उत्तरेला, इंद्रचापाप्रमाणे रंगीत मण्यांनी उभारलेली कमान आहे, तिथून आत गेले की यक्षपत्नीने पुत्रवत् ममत्वाने वाढवलेला, फुलांच्या घोसांनी खाली वाकलेला लहानगा मंदार, पाचूच्या पायऱ्यांनी मढलेली, वैदूर्यनालाच्या सुवर्णकमळांनी काठोकाठ भरलेली, हंसांच्या कलरवाने निनादित विहीर, तिच्या तीरावर नीलमण्याने निर्मित, कनकमयकर्दलीच्या कुंपणाने परिवेष्टित क्रीडाशैल (विहाराकरिता निर्मिलेला उंचवटा) मोगरीचा लता मंडप, घराच्या दोहो अंगांना बकुल व रक्त अशोकाचे वृक्ष, त्यांच्या मध्ये पाचूच्या शिलेवर उभी केलेली सुवर्णयष्टी, तीवर नित्यनेमाने येऊन बसणारा आणि यक्षपत्नीच्या टाळीवर, तिच्या कंकणांच्या सुमधुर तालावर नृत्य करणारा मयूर असे हृदयंगम, काहीसे रहस्यमय भासणारे, हवे हवेसे वाटणारे, यक्षाच्या वैभवाचा हेवा वाटेल असे हे त्याच्या घराचे चित्र. वाचक एका विस्मयचकित करणाऱ्या दुनियेतच जातो हे वाचताना.

घर जर इतके सुंदर तर गृहस्वामिनी कशी असेल? कालिदास तिचेही प्रत्ययकारी चित्रण रेखाटतो. (उत्तरमेघ. १५ पासून) संस्कृत साहित्यसृष्टीत स्त्रीवर्णनाला काही तोटा नाही, तरी कालिदासरचित नायिका आदर्शभूत असते. पद्मिनी या प्रकाराची ही यक्षपत्नी सावळी आहे, तिचे दात एकमेकांना चिकटलेले व टोकेरी आहेत, तिचे डोळे चपळ हरिणीसारखे चंचल आहेत अशा तऱ्हेचे शारीरिक वर्णन कालिदास करतोच, पण त्याच्यापुढे जाऊन तिचे भावसौंदर्य रेखाटतो. विरहतप्त युवती पत्नी एकाकी झाली आहे, रडून डोळे सुजले आहेत, गुडघ्यात मान घालून विमनस्क बसली आहे. कधी ती घरातील मैनेशी बोलत असते, कधी यक्षाचे चित्र काढत असते, कधी मांडीवर वीणा घेऊन गीत गाण्याचा प्रयत्न करीत असते, गाताना यक्षाचे नाव घेताच अश्रू झरू लागतात, वीणेच्या तारा छेडल्या जात नाहीत म्हणून वारंवार त्या पुसत असता, गीत विसरून ती उदास होते. शापाचे किती दिवस उरले आहेत हे मोजत राहते. नीज कशी ती तिला माहीत नाही. डोळे आसवांनी भरल्यामुळे निद्रेला जागाच नाही तिथे. यदाकदाचित तिचा डोळा लागला असेल तर तिला उठवू नकोस असे मेघाला सांगायला यक्ष विसरत नाही. जर तिचा डोळा लागला तर स्वप्नात ती यक्षाला स्वतःच्या मिठीत पहात असेल, हे मीलन मोडण्याचे पातक मेघ कसे बरे करील? (उत्तरमेघ ३७)

---

दुर्जन मंडळीत बसण्यापेक्षा एकटे बसणे बरे आणि एकटे बसण्यापेक्षा सज्जन मंडळीत बसणे हे त्याहून बरे.

**३) अलौकिक आनंद :** उज्जयिनीला पोचल्यावर मेघाने महाकाळाची आराधना करावी असे त्याला यक्ष सुचवितो. संध्याकाळच्या वेळेस नटराज शिव जेव्हा तांडवनृत्यास आरंभ करेल तेव्हा मेघाने शिवाच्या शरीरास लपेटून रहावे अशी सूचना. यामागचे इंगित काय तर, गजासुराचा वध केल्यानंतर त्याच्या विनंतीवरून शंकर रक्ताळलेले गजचर्म धारण करतो. हे बीभत्स दृश्य पाहून गौरी नजर वळवते, शिवाकडे पहात नाही. गजचर्मा ऐवजी गजासारख्या काळ्या मेघाचे वस्त्र, ज्यावर संध्याकालीन प्रकाश पडल्याने ते किंचित लालसर (रक्ताप्रमाणे) दिसत आहे ते शंकराच्या शरीराभोवती पाहून भवानीला जुगुप्सा वाटणार नाही, उलट ती पुत्राकडे पहावे असे कौतुकाने मेघाकडे पाहीलं आणि तिच्या त्या कृतज्ञ दृष्टीने मेघाला स्वजन्म धन्य झाल्यासारखे वाटेल असे कालिदासाला म्हणावयाचे आहे. नृत्तारम्भे हर पशुपतेरार्द्रनागाजिनेच्छां शान्तोद्वेगस्तिमितनयनं दृष्टभक्तिर्भवान्या।। (पूर्वमेघ.३९)

कालिदासाची शिवपार्वतीच्या ठिकाणी असलेली अनन्यसाधारण भक्ती एक नितांतरम्य उत्प्रेक्षा होऊन पूर्वमेघाच्या ६३ व्या श्लोकात आपल्यासमोर येते. मेघ हा इंद्राचा कारभारी, म्हणून कामरूप, हवे ते रूप धारण करणारा. त्याने पुष्पमेघ होऊन देवगिरी पर्वतावर जाऊन कार्तिकेयावर फुलांचा अभिषेक करावा असे यक्षाने आधी सुचविले आहेच. (पूर्वमेघ.४६) आता यक्ष त्याला शिवभक्तीने कृतार्थ व्हायला सांगतो. यक्ष मेघाला सांगतो, तू तुझ्या उदरातील जलाच्या साठ्याचे स्तंभन कर, त्याचा घट्ट बर्फ कर आणि मग दे झोकून स्वतःला कैलासाच्या उतारावर. शिव पार्वती तिथे नित्य फिरावयास येतात, आणि सुकुमार गौरीला हिमालयाच्या चढावर चालल्याने श्रम होतात, अगदी सर्पकांकणे काढून ठेवलेला शिवाचा हात धरूनही; तेव्हा तिच्या मार्गावर जर तू स्वतःला लोटलेस तर उदरातील जलौघाचा बर्फ झाल्याने तुझ्या गोलाकार पर्वांच्या आकाराला पायऱ्या पायऱ्यांच्या जिन्याचे स्वरूप मिळेल आणि गौरीला ह्या पायऱ्या चढणे सोपे जाईल. सोपानत्वं कुरु मणितटारोहणायाग्रयायी। किती भावमधुर कल्पना! हे निखळ शब्दचित्र आहे.

रवींद्रनाथ टागोर म्हणतात की, 'कालिदासाच्या सर्व साहित्यात आनंदाच्या या छटा आहेत, आणि शारीर स्तरावरून प्रेमाचे उन्नयनही आहे. क्षणभर हे मानले तर उज्जयिनी ह्या कालिदासाला अत्यंत प्रिय असलेल्या आणि महाकालाचे स्थान असलेल्या नगरीत आल्यानंतर यक्षाची कामासक्ती थोडी क्षीण झाली आणि त्याला दैवी, अलौकिक आनंदाची ओढ लागली असे म्हणावेसे वाटते' टागोरांचा सिद्धांत नाही मानला तरी प्रणयाचा आणि आनंदाचा उत्कर्ष केवळ शारीर सुखोपभोगात नसून त्यागाच्या, समर्पणाच्या एका अनोख्या अतूट तृप्तीत, समाधानात आहे हे उमजते. काळ्या मेघाला हा अलौकिक आनंद लाभला, तो कृतार्थ झाला, स्वार्थ विसरून तो परमार्थी झाला. भारतीय आध्यात्मिकताच एक प्रकारे यातून अभिव्यक्त झाली आहेसे भासते.

संपूर्ण मेघदूत हे काव्य 'दिवः कान्तिमत् खण्डमेकम' (पूर्वमेघ.३१) स्वर्गलोकीचा झळाळता तुकडा आहे असे काहींचे मत आहे कारण ह्या काव्याची समृद्धी, वैभव. मला तर वाटते की, हे काव्य 'हस्तप्राप्यस्तबकनमितो बालमन्दारवृक्षः'(उत्तरमेघ.१५) आहे. फुलांच्या भाराने वाकलेला वृक्ष, याचे गुच्छ सहजी हाती येतात, प्रत्येक रसिकाला हवी तेवढी फुले सहज मिळू शकतात. मला पावलेली ही रसिकानंददायक शब्दफुले कालिदासाच्याच चरणी समर्पित!

**– डॉ. गौरी माहुलीकर**
ज्येष्ठ संस्कृत विदुषी
चिन्मय विश्वविद्यालय, केरळ

•••

# कचारगडची गुफा

*महाराष्ट्रातील सर्वात मोठी नैसर्गिक गुफा, स्वामी विवेकानंदांनी अनुभवलेल्या पहिल्या समाधीचे स्थान, गोंड आदिवासी जमातीचे प्रमुख धार्मिक स्थळ आणि नवाश्मयुगीन मानवांचे प्रथमच गुहेत केलेल्या वास्तव्याचे पुरावे, यामुळे एक वैशिष्ट्य प्राप्त झालेल्या कचारगड गुफेचे वर्णन या लेखात केलेले आहे. - संपादक*

गुहांचे साधारणपणे निसर्गनिर्मित आणि मानवनिर्मित असे दोन प्रकार आहेत. निसर्गनिर्मित गुहा म्हणजे शैलाश्रय तर मानवनिर्मित गुहा म्हणजे लेणी. निसर्गनिर्मित शैलाश्रयांचा संपूर्ण महाराष्ट्रात लक्षणीय असा समूह महाराष्ट्राच्या पूर्व सिमेवर गोंदिया जिल्ह्यातील सालेकसा तालुक्यात असलेल्या दरेकसाच्या घनदाट जंगलात मैकल पर्वत श्रेणी मध्ये आहे. गोंड आदिवासींचे मोठे धार्मिक स्थळ म्हणून यास मान्यता आहे. या गुहेस कचारगड अथवा काचगड असे म्हणतात. काच या शब्दाचा गोंडी भाषेतील अर्थ लोखंड असा होतो. या गुहेत आपल्या पूर्वजांची हत्यारे ठेवली आहेत, असा गोंड आदिवासींचा दृढ विश्वास आहे.





एका मान्यतेनुसार स्वामी विवेकानंदांना याच परिसरात पहिली ध्यानावस्था प्राप्त झाली होती. त्याचे असे झाले की, विवेकानंदांच्या वडिलांना न्यायालयीन कामकाजानिमित्त कलकत्त्याहून आताच्या छत्तीसगड मधील रायपूरला यावे लागले. त्याकाळी कलकत्ता - मुंबई व्हाया अलाहाबाद, जबलपूर, भुसावळ हा लोहमार्ग उपलब्ध होता. त्यामुळे कलकत्त्याहून भुसावळपर्यंत रेल्वेने आणि नंतरचा प्रवास बैलगाडीने नागपूर, गोंदिया, राजनांदगाव, असा करावा लागायचा. तेंव्हा कचारगडच्या घनदाट जंगलात दूरवर दिसणाऱ्या भल्यामोठ्या मधमाशांच्या पोळ्याकडे बघून त्यांना ध्यानावस्था प्राप्त झाली आणि ते समाधीवस्थेत गेले.

स्वामी विवेकानंदांच्या या पहिल्या ध्यानावस्थेचा परिसर म्हणून या स्थानाला एक आगळेच वलय प्राप्त झाले आहे.

दुसऱ्या एका आख्यायिकेनुसार जिल्हा- नागपूर, तह- पारशिवनी, ग्राम-कुंवारा भिवसेन येथील गोंडराजकुमार जय- पेरसापेन याचा विवाह डोंगरगढ जिल्हा- राजनांदगाव येथील राजकुमारी असणाऱ्या जुळ्या बहिणींशी निश्चित झाला. त्याकाळी कुंवारा- भिवसेन हे अखिल भारतीय गोंड आदिवासी जमातीचे प्रमुख राजधानीचे नगर होते. तेंव्हाच्या प्रथेनुसार डोंगरगढ येथील या बहिणी लवाजम्यासह वराच्या घरी लग्नासाठी निघाल्या. वाटेत विसावा म्हणून कचारगडला थांबल्या. वास्तवात या स्थानाच्या अधिपतीला त्यांच्याशी लग्न करण्याची इच्छा होती. तेंव्हा त्यांना अडकवण्याच्या हेतूने त्या कुमाराने गुहेचे तोंड अवाढव्य शिळा ठेवून बंद केले. अशा प्रकारे मुहूर्त टळल्याने नियोजित विवाह होऊ शकला नाही.

इंग्रज राजवटीत नागपूरचा ख्रिश्चन धर्मप्रसारक हिस्लॉप यांनी एका गोंडी लोकगीता मधून कचारगड गुहे संदर्भात नोंदवलेल्या कथेनुसार 'महादेव' म्हणतो की, 'लाल टेकडीच्या गुहेमध्ये गोंड लोक बंदिस्त करून ठेवले व त्यावर विशाल दगड लावून त्याचे मुख बंद केले. तेंव्हा आदिवासींचा नायक पारी कुमार लिंगो याने त्यांना मुक्त केले. ते सर्व आदिवासींचे पूर्वज होते.'

असो, या गुहांमध्ये चार नैसर्गिक शैलाश्रये आहेत. पर्वताच्या पायथ्याशी असलेल्या दोन पावसाळी प्रवाहापासून या गुहा ५५ मीटर उंचीवर आहेत. यातील सर्वात मोठी गुहा अवाढव्य म्हणावी अशीच आहे. एकाच खडकात तयार झालेली ही गुहा ५८ मीटर लांब आणि ५७ मीटर रुंद आहे. प्रवेशद्वारा जवळच ती २५ मीटर रुंदीची असून तिच्या कमानीची सरासरी उंची ९४ मीटर इतकी विशाल आहे. महाराष्ट्रातील नैसर्गिक शैलाश्रयांमध्ये ही गुहा सर्वांत मोठी असावी.

या पश्चिमाभिमुख गुहेच्या दक्षिण - पूर्वेस एक छिद्र छताच्या आरपार गेले असून, त्यातून सहज आकाशदर्शन होते. गुहेच्या दक्षिण कोपऱ्यात एक नैसर्गिक झरा असल्यामुळे गुहेत पाण्याचीही व्यवस्था झालेली आहे. गुहेत तीन कोनाडे आहेत. बहुतेक पृष्ठभाग राखेने व्यापला असून साधारणपणे ५०० माणसे सहज बसू शकतील अशी ही गुहा प्रकाश व पाणी यांनी समृद्ध आहे. उन, वारा, पाऊस, जंगली श्वापदे यापासून तेथे नैसर्गिक संरक्षण प्राप्त होत असल्यामुळे अश्मयुगीन मानवाने दीर्घकाळ या स्थळाचा वापर निवासासाठी केला असावा.

या गुहेत १९९२ साली पुरातत्त्वज्ञ श्री. ए. के. शर्मा यांच्या नेतृत्वाखाली एक चाचणी उत्खनन करण्यात आले होते. त्यात मानवी वस्तीशी संबंधित एकूण सहा स्तर प्राप्त झाले. त्यापैकी वरील दोन पृष्ठभाग ऐतिहासिक कालखंडाशी संबंधित आहेत. मधल्या कालखंडातील स्तरांमधून नवाश्मयुगीन दगडी हत्यारे आणि हात-बनावटीची मृद्भांडी प्राप्त झाली, तर सर्वात प्राचीन कालखंडात मध्ययुगीन दगडी अवजारे प्राप्त झालीत. यापूर्वी आढळलेल्या सर्व नवाश्म युगीन वसाहती या मोकळ्या प्रदेशात होत्या. कचारगड येथे प्रथमच नवाश्ममयुगीन मानवी अस्तित्वाचे पुरावे गुहेत प्राप्त झाले. येथील इतर तीन गुहा या आकाराने लहान आहेत.

विदर्भाच्या या जंगलव्याप्त टापूत अनेक शैलाश्रये व शीलाश्रये आहेत. यातील बहुतेक गुहांमध्ये महादेवाचे स्थान असून, तिथे यात्रे दरम्यानच जाता येते. केवळ धार्मिक यात्रा स्थाने म्हणून न बघता ती अश्मयुगीन मानवाची निवासस्थाने होती, या दृष्टीने त्यांच्या संवर्धनासाठी प्रयत्न व्हायला हवेत.

कचारगड हे स्थान रेल्वेने दरेकसा या स्थानकाच्या जवळ असून, या ठिकाणी ऑटो आणि इतर साधने गंतव्य स्थानापर्यंत जाण्यास उपलब्ध असतात. सडकमार्गाने तर सरळ गुहेपर्यंत बारमाही पक्क्या वाटेने जाता येते. विशेष म्हणजे गुहे जवळून वाहणाऱ्या प्रवाहांना पाटबंधारे विभागाने बांध घालून तलाव तयार केला असून, त्याचे पाणी कालव्याद्वारे आजूबाजूच्या परिसरातील शेतकऱ्यांना पुरविले जाते. पुढे हेच पाणी सुमारे दोन कि.मी. अंतरावर अंदाजे पन्नास फूट कड्यावरून खाली कोसळत खाली येते. हाच तो प्रसिद्ध 'हाजराफॉल्स'. त्यामुळे कचारगडची प्राचीन गुफा आणि हाजराफॉल्सचे सौंदर्य आपण एकाच वेळी भेट देवून अनुभवू शकतो.

**- दिलीप नारायण वंडलकर**
४, नरकेसरी सोसायटी, उज्ज्वलनगर,
नागपूर - ४४००२५
मो.नं.: ९८३४६३६६५५
इ-मेल- wandalkardilipgmail.com

●●●

तारूण्य म्हणजे जीवनाचा रचनाकाळ आहे.

# उत्तम कविता कशी असते ?

*सोशल मीडियावर गेलं की कवितांचा अक्षरशः पाऊस पडलेला असतो. असं मुक्तपणे व्यक्त होणं आणि धुवाधार कोसळणं चांगलं असतं. सगळ्यांना व्यक्त व्हायचा अधिकार आहे आणि गरजही आहे. सोशल मीडियाने हे व्यक्त होणं एकदम सहज, सोप्प केलंय. मात्र उत्तम कविता काय असते यावर आपलं विशेष लक्ष नसतं. नेमका याच विषयावर डॉ. आनंद कुलकर्णी यांचा लेख – संपादक*

जो भेटतो तो प्रत्येक माणूस कवी असतो
मग मी कवी नाही हे कळून मी हरखून जातो
(एवढे कळले तरी पुरे की... ही कविता नाही.)

सोशल मीडियावर गेलं की कवितांचा अक्षरशः पाऊस पडलेला असतो. असं मुक्तपणे व्यक्त होणं आणि धुवाधार कोसळणं चांगलं असतं. सगळ्यांना व्यक्त व्हायचा अधिकार आहे आणि गरजही आहे. सोशल मीडियाने हे व्यक्त होणं एकदम सहज, सोप्प केलंय. पण असं सगळं वाचून/ऐकून माझ्यासारख्या पामर रसिकाला दडपून जायला होतं. काय आणि किती वाचावं/ऐकावं असं होतं. भेटेल तो कवीच निघतो, बोलेल ती कविताच असते, वाचू ते काव्यच असतं. आपल्याकडे प्रत्येकजण कवी असतोच/असतेच. जणू कविता हा आपला राष्ट्रीय स्वभाव आहे! कवितेची अशी अनिवार ओढ चांगली आहे आणि संवेदनशील माणसाला ती असतेच. सरळ, गद्यात आपल्याला बोलता येतं का नाही असा संभ्रम व्हावा इतके आपण काव्यमय झालेलो आहोत. पण शब्द गोळा करून आणि ओळी जोडून कविता होते? आणि अशा कवितेला 'वाहवा'ची फुटकळ दाद द्यायची असते? माझा कविता लिहिण्यावर आणि तिला दाद देण्यावर आक्षेप नाही. माझं म्हणणं असं आहे की, यामुळे कसदार कविता आपल्याला ओळखू येत नाहीत, कळत नाहीत. त्यांना कशी दाद द्यायची हे आपल्याला कळत नाही. मग आपण अशा कवितांना टाळत राहतो. खूप काळ पातळ आशय असलेल्या, थेट अंगावर येणाऱ्या, सूचकता घालवून बसलेल्या आणि पूर्णपणे रचनाहीन झालेल्या कवितांतून शब्दांचा मारा झाला की असं होणारच. आपण बोलू आणि लिहू ती कविता होते का? सगळंच गद्य हे कविता आहे का आणि असेल तर मग आपण गद्यालाच कविता मानू. सगळंच फक्त कवितेतूनच मांडायचं असतं का? यांतून आणि यामुळे कसदार कविता आपल्या हातून निसटतात; आपण उत्सवी आणि लखलखणाऱ्या कवितांचे भक्त होतो !

आशय हा कवितेचा प्राण असतो. आशय जेवढा कसदार तेवढी कविता असरदार होते. हे म्हणजे मजबूत अंगकाठी आणि संवेदनशील मन यांसारखं असतं. वरून तुम्ही कितीही चकचकीत मुलामा द्या, मूळची अंगकाठी म्हणजे आशय नसल्यावर काय होणार? अशा शाब्दिक कॉज्मेटिकचा उपयोग फक्त चमकण्यासाठी आणि इंम्प्रेशन मारण्यासाठी होतो. त्याचा असर होत नाही. आशयाला अधिक उठावदारपणे व्यक्त होण्यासाठी आकृतीबंध लागतो. अर्थात आकृतीबंध तेव्हाच लागतो जेव्हा कवी पारंपरिक कविता प्रकारांमध्ये लिहित असतो. प्रयोगशील लिहायचं असेल तर आकृतीबंध असलाच पाहिजे असा आग्रह धरता येत नाही. मग कवीला स्वतःच्या आशयाला व्यक्त करेल असा form विकसित करावा लागतो.

सूचकता हे कवितेचं महत्त्वाचं वैशिष्ट्य असतं. कविता obvious नसते, नसायला पाहिजे. तिला face

value नसते, ती बोलते ते तिला बोलायचं नसतं, तर ती ते सूचवत असते. हे सूचवण्यासाठी कविता प्रतिमांचा आधार घेते, रुपक आणि प्रतीकांचा वापर करते. आपल्याला हे सूचवणं कळलं पाहिजे. ती जे संदर्भ प्रवाहित करते, जे अनुभव सूचित करते ते आपल्याला पकडता यायला पाहिजेत. असं झालं नाही तर आपण कवितेच्या सुंदर रचनाबंधात, दिसणाऱ्या आकर्षक सापळ्यात अडकून पडतो. मग आशय बाजूला राहतो आणि आपण 'वरलिया रंगा' भूलून जातो. आणि रचनाही आकर्षक नसेल तर मग आपण निव्वळ टाईमपास किंवा कवीची खोटी वाहवा करतो.

शब्द हे कवितेचं माध्यम असतात. कवी शब्दांशी खेळतच असतो/असते. प्रत्येकाची खेळण्याची तऱ्हा वेगळी असते. ती आपल्याला ओळखता यायला हवी. त्यात शब्दांची निवड आणि प्लेसमेंट महत्त्वाची. हे चुकलं तर कविता होतं नाही. 'A thing of beauty is a joy forever' ही कविता होते, पण 'A beautiful thing is forever joyful' ही कविता होत नाही. 'The best lack all conviction, while the worst/ are full of passionate intensity' ही कविता होते; पण 'The best people do not have conviction, while the worst people are full of confidence' ही कविता होत नाही. कविता होण्यासाठी ती obvious नसायला पाहिजे, literal नसायला पाहिजे. ती rhetorical असेल तर ठीक आहे; पण त्यापेक्षा अधिक ती suggestive असली पाहिजे. कारण फक्त rhetorical झाली की कविता अलंकारिक जास्त होते. तिच्यात शब्दांची चमत्कृती जास्त होते, आशय झाकोळतो. उदाहरण म्हणून जॉन मिल्टनची ही प्रभावशाली चमत्कृती बघा (alliteration)– "Behemoth biggest born of earth upheaved His vastness: Fleeced the flocks and bleating rose, As plants."

यांतील 'b' आणि 'f' अक्षर/ध्वनीची पुनरावृत्ती नजरेत भरण्यासारखी आहे. हे वाचून आपण दिपून जातो. पण तीच पुनरावृत्ती –

"The fair breeze blew, the white foam flew,
The furrow followed free;
We were the first that ever burst
Into that silent sea" (S.T. Coleridge)

अशी असेल तर ती आपल्यासाठी लय पकडते आणि सूचकही होते.

आणि पुनरावृत्ती अशी असेल–

"I have looked down the saddest city lane.
I have passed by the watchman on his beat
And dropped my eyes, unwilling to explain"
(Robert Frost)

– तर ती tongue twister उरतच नाही. यातील looked आणि lane, eyes आणि explain बघा. इथे पुनरावृत्ती सूक्ष्म आणि तरल होते. चमत्कृती कमी होते, आशय धारदार होतो.

आधुनिक कविता prose सारखी असते, पण prose नसते. त्यात अलंकार कमी असतात, सूचकता अधिक असते. याचा अर्थ ती prosaic, वीरल आणि unpoetic असते असं नाही. ती suggestiveness या अर्थाने काव्यात्म असते. रचना आणि आशयाच्या विविध शक्यता शोधताना ही कविता पारंपरिक निकष नाकारते. मग गेयता, अलंकरण, आकृतिबंध अशा सर्व पातळ्यांवर प्रयोग केलेले असतात. हे सगळं नाकारताना कविता म्हणजे काहीही लिहिणं असं होत नाही. प्रयोगाच्या नावाखाली आशयाचा गळा घोटता येत नाही. याउलट आशय अधिकाधिक कसदार आणि आव्हानात्मक करावा लागतो आणि तो करायचा तर सूचकतेचा index खूप वाढवावा लागतो. आता शब्दांची

चमत्कृती मदतीला नसते. त्यामुळे निव्वळ आशयाच्या कसदारपणावर अख्खी रचना निभावून न्यायची असते. हे म्हणजे कशाचीही साथ संगत न घेता फक्त तंबोऱ्यावर षड्ज लावण्यासारखं असतं. म्हणून अशी प्रयोगशील कविता लिहिणं जोखमीचं असतं.

हे आपण उदाहरण घेऊन बघू. आपण सगळे सध्या मोबाईल addicted आहोत. त्यामुळे आपल्या आयुष्यात अनेक समस्या निर्माण झाल्या आहेत. समजा त्यावर आपल्याला कविता लिहायची आहे. आणि ती आपण अशी लिहिली–

We use mobile phones as if they are our friends.
Mobile phones cause many problems.
We live in the constant state of distraction,
our social life is disrupted.
Our work never ends and expenses never cease.
Mobiles cause accidents and health problems.

हे वाचल्यावर तुम्हाला ही कविता आहे असं वाटलं? नक्कीच नाही. काहीतरी असं आहे जे इथं मिसिंग आहे. काय आहे ते? आशय. या कवितेला आशयच नाही. त्यामुळे ही कविताच नाही. फार तर ते भाषण होईल किंवा निबंधाचा भाग होईल. आता खाली दिलेली रचना वाचा–

Text

Carol Ann Duffy
I tend the mobile now
like an injured bird

We text, text, text
our significant words.

I re-read your first,
your second, your third,

look for your small xx,
feeling absurd.

The codes we send
arrive with a broken chord.

I try to picture your hands,
their image is blurred.

Nothing my thumbs press
will ever be heard.

काय वाटलं वाचल्यावर? ही कविता आहे असं वाटलं ना. कारण काय? त्यात तगडा आशय आहे. 'like an injured bird' या दुसऱ्या ओळीपासूनच ही रचना काव्यात्म होते. कारण ती mobile चा literal अर्थ सांगत नाही; तर जखमी पक्ष्याशी तुलना करून अर्थ बदलते. तुमच्या लक्षात आलं का, की यात १४ ओळी आहेत. पण त्या sonnet सारख्या नाहीत. ओळी short, terse आहेत– संक्षिप्त आणि नियंत्रित आहेत. म्हणजे कवीला sonnet चा पारंपरिक रचनाप्रकार नको आहे. तिला आजचा आशय मांडायचाय. मग sonnet असा form घेतं. इथे महत्त्वाचा आहे आशय आणि तो अतिशय प्रभावीपणे आपल्यापर्यंत येतो. या रचनेतील सूचकता तिला दर्जेदार कवितेचं रूप देते.

**– डॉ. आनंद कुलकर्णी**
इंग्रजी विभाग प्रमुख
ग्रामोन्नती मंडळाचे कला विज्ञान व वाणिज्य
महाविद्यालय, वारुलवाडी, नारायणगाव
ता. जुन्नर, जि. पुणे– ४१०५०४

•••

*दिशा संपर्क दूरध्वनी*
०२२-२५४२ ६२७०

# अनुबंध

*अर्थापेक्षा भावना महत्त्वाची असते. – गुलजार It is the feeling what is more important than the meaning of the word(s). Outlook मासिकाने अलीकडेच एक अनुवाद या विषयाला वाहिलेला अंक प्रकाशित केला आहे. त्यात एक लेख गुलजार साहेबांचा आहे. गुलजार साहेबांचे उपरोक्त विधान त्या लेखात आहे. – संपादक*

'अर्थापेक्षा भावना महत्त्वाची असते.'

हे वाक्य तिथे वाचले आणि नकळत थबकलो.

किती खरे आहे ना हे वाक्य. .. .

आयुष्यात असे किती वेळा जाणवते ना !

असं थबकण्याची अनेक कारणे. ..

अनेक कंगोरे. ..

आपल्या भाव – भावना अचूकपणे शब्दांत पकडणारा सिद्धहस्त साहित्यिक म्हणजे गुलजार साहेब.

हे लेखन म्हणजे एका अर्थाने आपल्या भावनांचं अनुवादच की !

ज्यांनी इतर भाषांतील साहित्याचा अनुवाद केला आहे आणि ज्यांच्या अनेक पुस्तकांचा अनेक भाषांत अनुवाद झाला आहे असा लेखक म्हणजे गुलजार !

कधी कथा, कधी कविता, कधी गीत, कधी पटकथा, कधी संवाद.

स्वतःच्या भावनांचा बहुपेडी अनुवादच. .. ..

असं थबकताना. ..

आपण अनेकदा म्हणतो की, पुस्तक खूप मस्त आहे; पण त्यावर आधारित असणारे नाटक किंवा सिनेमा तेवढा परिणाम करत नाही.

पुस्तकाचा सिनेमा किंवा पुस्तकावर आधारित नाटक हा एक प्रकारचा अनुवादच की! ... भाषा बदलली किंवा बदलली नाही तरी त्याचा आकृतिबंध बदलतोच की !

त्यावेळी असे होत असेल का, की अनुवादक शब्दांच्या अर्थात अडकतो --- गुरफटत जातो. .. .

आणि मग भावना बोटांतून वाळू गळावी तशी.

पाणी गळून गेले तरी हात ओले राहतात

काहीवेळ तरी. .. .

पण आपले आपल्यालाच जाणवत राहते की, ओले आणि ओलावा हे वेगवेगळं असते. अर्थ आणि अनुभव (भावना अशा अर्थाने) वेगवेगळेच असतात

अगदी एका दिशेने जाणारे असले तरी एक नसतात.

अर्थ आणि भावना. ..

अनुवाद. .. ..

असं थबकताना. ..

सहजच मनात आले की, अनुवादकाच्या सुद्धा असे लक्षात येत असेल की, काहीतरी निसटते आहे. पण त्याचाही नाईलाज होत असेल काही – काहीवेळा!

कारण भावना आणि त्यांची अभिव्यक्ती सापेक्ष असते.

भूगोल, इतिहास, संस्कृती, रिवाज यांचा अनुवाद नाही होत ना !

तसेच इतरही काही. .. .

गेल्याच महिन्यात आमच्या डोंबिवलीत सुप्रसिद्ध लेखिका आणि साक्षेपी अनुवादक उमा कुळकर्णी यांच्या जाहीर मुलाखतीचा कार्यक्रम झाला होता. त्यात त्यांनी सांगितलेल्या दोन – तीन गोष्टी मनात कुठेतरी होत्या.

असाव्यात. ..

---

जे अवास्तव अपेक्षा करीत नाहीत ते खरे भाग्यवान. कारण त्यांच्यावर निराश होण्याची पाळीच येत नाही !

हा अंक वाचताना. .. .

उमाताई कुळकर्णी त्या कार्यक्रमात म्हणाल्या होत्या. ..

कन्नड साहित्याचा मराठीत अनुवाद करताना त्यांना अनेकदा जाणवते की ''मराठी लेखिकाही पुरुषी मराठी लिहितात; कन्नड मध्ये तसे होत नाही''

आणि त्यांनी त्यावेळी सांगितलेला दुसरा मुद्दा. ..

''कन्नड साहित्यिक कितीही शिकले, कितीही शहरांत, अगदी महानगरात राहिले तरी त्यांची ग्रामीण मुळे सुटलेली नाहीत.''

असं जर एकाच देशातल्या दोन भाषांमध्ये होत असेल तर दोन वेगवेगळ्या देशातल्या भाषा. .. .

भावना आणि अर्थ. .. .

अनुवाद. .. .

असं थबकताना. ..

असंही मनात आले की, काही गोष्टी या जाणून घ्यायच्या असतात. .. . त्या मुळात शब्दांत येत नाहीत. .. . त्या नजरेने, स्पर्शाने बोलतात.

''कर पडले गळ्यात तुझे,
पण वरमाला पडणार कधी
तू नजरेने 'हो' म्हटले,
पण वाचेने वदणार कधी''

ही भावना आजच्या उठसूठ 'मिठी मारायच्या जमान्यातील' मराठीत कशी काय अनुवादात पकडणार?

''रानात सांग, कानांत आपुले नाते
मी भल्या पहाटे येते''

हे तर फारच लांब राहिले. .. .

भावना आणि अर्थ. .. .

अनुवाद. .. .

असं थबकताना. .. .

असंही मनात आले की, शब्द लेखी असू दे नाही तर बोली. .. .

काहीवेळा त्याचा अर्थ उच्चाराने बदलतो. .. .

उच्चार संदर्भ - सापेक्ष. .. .

आता हा उच्चार अनुवादात. ..

भावना आणि अर्थ. ..

अनुवाद. ..

असं थबकताना. .. ..

मी आजपर्यंत कधीच कोणत्याच पुस्तकाचा अनुवाद केलेला नाही.

तरीही असं वाटतं.

जिथे आपल्याच भावना आपल्याला काहीवेळा शब्दांत पकडता येत नाहीत. .. .

कधी अनभिज्ञता. .

कधी अपरिहार्यता. .. .

तिथे. ..

भावना आणि अर्थ. ..

अनुवाद. .. .

असं थबकताना. ..

अजून एक गंमतीचा विचारही मनात आला. असं शेअर बाजारातही होते की !

टेक्निकल अनालिसिस, फंडामेंटल अनालिसिसच्या जंजाळात एकदा फसले, की तांत्रिकता वरचढ होत जाते आणि कार्यप्रवण अर्थ मागे पडतो. .. .

अर्थ आणि भावना

अनुवाद. ..

**– चन्द्रशेखर टिळक**
सी-४०२, राज पार्क, मढवी बंगल्याजवळ,
राजाजी पथ, डोंबिवली (पूर्व), पिन - ४२१२०१
भ्रमणध्वनी - ९८२०२९२३७६

•••

# आमची अंदमान आनंद यात्रा

*'अंदमान अनुभवणं' हा जान्हवी सारख्या तरूणाईबाबतचा एक वेगळाच अनुभव असू शकतो. त्यांची विचारधारा वेगळीच परंतु महत्त्वाची असू शकते. त्यांचा डोळसपणा आपण एक वाचक म्हणून लक्षात घ्यायला हवा - संपादक*

'अंदमान बोलवतंय' या युवा-यात्रेबद्दल प्रसार-माध्यमावर खूप ऐकलं होतं... पण गंमत अशी की, त्यांच्या वयाच्या अटीमध्ये आम्ही कुठेच बसत नव्हतो... त्यामुळे यात्रा प्रत्यक्ष जरी अनुभवता आली नाही तरी त्या यात्रेबद्दल जाणून घ्यायला मन फार उत्सुक होतं..

म्हणूनच जेव्हा जान्हवी या यात्रेवरून आली तेव्हा लगेचच तिला भेटले. जवळजवळ अडीच-तीन तास तिच्याशी खूप गप्पा मारल्या.

आणि तिच्या अनुभवातून मी ही यात्रा अनुभवली...

त्या गप्पांचा हा सारांश...

**मनमोकळ्या गप्पा जान्हवीशी...**

''तुम्हा दोघींमध्ये छान बॉण्डिंग व्हावं, तुम्ही एकत्र वेळ घालवावा, तुम्ही खूप गप्पा माराव्यात, तेही अगदी छान, मजेत, धम्माल, मस्ती करत, पण तुमच्या 'विचारांना दिशा देत' म्हणून एका खास युवा यात्रेला तुम्ही दोघी जाणार आहात...'' आमचे बाबा म्हणजे डॉक्टर महेश बेडेकर आम्हाला हे सांगत असताना कोणती धमाल ट्रिप असेल या विचारात आम्ही असतानाच ते पुढे म्हणाले, 'स्वातंत्र्यवीर सावरकरांबद्दल अधिक जाणून घेण्याची ही सुवर्णसंधी आहे.'

यावर आम्ही 'नाही' म्हणण्याचा प्रश्नच नव्हता. आम्ही दोघीच, एकट्याने इतके दिवस विमानमार्गे समुद्र प्रवासाला जाणार या कल्पनेनेच मोहरून गेलो.

आणि अशा पद्धतीने अखंड हिंदू राष्ट्राचे पुरस्कर्ते, भारतीय क्रांतिकारकांचे मुकुटमणी, हिंदू तेज सूर्य स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या विचाराने प्रेरित 'युवा' यात्रेला आमची नोंदणी झाली. दिनांक २९ मे २०२३ ते ०४ जून २०२३ या कालावधीसाठी.

शब्दामृत प्रकाशन आयोजित 'अंदमान बोलवतंय' या यात्रेची ही पहिलीच युवा यात्रा. आणि सोबतीला अभिनेते व व्याख्याते सावरकर विचार प्रसारक श्री. शरद पोंक्षे काका आणि पार्थ बावस्कर दादा.

तरुणांच्या मनामध्ये सावरकर विचार रुजवण्याच्या हेतूने प्रेरित यात्रेसाठी त्यांनी साद घातली आणि संपूर्ण महाराष्ट्रातून जवळजवळ ६०/७० जणांनी नोंदणी केली. मात्र वयोगट मर्यादित होता. १५ ते २९. त्यामुळे या वयोगटातील आमच्या या सहलीत २८ मुली आणि इतर मुलं सहभागी झाली होती. ठरल्याप्रमाणे आम्ही दोघी २९ मे ला दुपारी साडे-तीनच्या सुमारास अंदमान विमानतळावर पोहोचलो.

अंदमान निकोबार बेटाची राजधानी पोर्ट ब्लेअर येथे. तिथे आधीच उपस्थित आदेश दादाने मुलांच्या व शौनक व धवलदादाने मुलींच्या व्यवस्थेची जबाबदारी स्वीकारली होती. आता यापुढे सात दिवस आम्ही या दोघांचं बोट धरून चालणार होतो.

**दिवस पहिला**

२९ मे २०२३ विमानतळाहून बसने दहा मिनिटांच्या अंतरावर 'सी पोर्ट' या हॉटेलमध्ये आम्हा मुलींची

उतरण्याची सोय केली होती. एका खोलीत दोघीजणी. अर्थात आम्हा दोघी बहिणींना एक खोली मिळाली हे एक वेगळे नमूद करायला नको. आई-बाबा किंवा घरचे कोणीही सोबत नसताना आमचा हा प्रवास आम्ही आता जबाबदारीने, मिळून-मिसळून एकत्र, एका विचाराने राहायला हवं याची जाणीव करून देत होता. त्यामुळे आपसूकच आम्ही एकमेकींची काळजी घ्यायला लागलो. दुपारच्या जेवणानंतर तासभर विश्रांती घेऊन संध्याकाळी पाच वाजता आमच्याच हॉटेलमध्ये (कारण मुलांची राहण्याची व्यवस्था दुसरीकडे करण्यात आली होती) एकत्र सर्वांच्या परिचयाचा कार्यक्रम पार पडला. त्यावेळी समजलं की, मराठी अभिनेते श्री. सुबोध भावे यांचा मुलगा कान्हा भावे  व आणखी एका अभिनेत्रीची मुलगी आमच्या सोबत या सहलीला आली आहे. थोडक्यात सेलिब्रेटिंसोबत युवा यात्रा असा हा आमचा अनुभव! परिचयानंतर आमच्यासाठी एक सुखद धक्का वाट पाहात होता. आदल्याच दिवशी म्हणजे २८ मे ला माझी लहान बहीण गायत्री बेडेकरचा वाढदिवस. हे त्यांना कळल्यावर लगेचच केक आणला गेला आणि एकच वाढदिवस दुसऱ्यांदा साजरा झाला. नंतर जेवणं उरकली आणि आम्ही रूमवर आलो. दुधात साखर मिसळावी अशा पद्धतीने आमच्या समोर आमच्या समवयस्क गार्गी (मुलुंड), केतकी (बेळगाव) या मैत्रिणी मिळाल्या. मग काय ! समोरासमोर रूम, गप्पा, हास्यविनोद नुसती धमाल ...

रात्री बऱ्याच उशिरा आम्ही झोपलो, कारण उद्या पहाटे साडे-तीन वाजता रिपोर्टिंग आहे या धास्तीने!

**दिवस दुसरा**

३० मे २०२३ ठरल्याप्रमाणे पहाटे साडे-तीन वाजता आम्ही एकत्र जमलो. इतक्या पहाटे निघण्याचं कारण म्हणजे आम्ही तिथूनच अडीच तासांच्या अंतरावर असलेल्या बारटांग या प्रसिद्ध प्रेक्षणीय स्थळाकडे निघालो होतो. या प्रवासासाठी अंदमान शासनाची विशेष परवानगी घ्यावी लागते व एकावेळी केवळ पन्नास वाहनांना परवानगी दिली जाते. त्यामुळे तिथे वेळेत पोहोचून परवानगी मिळवणे अत्यावश्यक असतं म्हणून पहाटे चारला आम्ही निघालो. भारताच्या अंदमान निकोबार केंद्रशासित प्रदेशाच्या द्वीपसमूहातील हे एक मोठे बेट.

पोर्ट ब्लेअर पासून साधारणतः दीडशे किलोमीटर उत्तरेस आहे. तिथे 'चिखली ज्वालामुखी' म्हणजे 'मड वोल्कॅनो' आढळून येतात. हे 'रांचीवाला आयलँड' या नावानेही ओळखले जाते. जे लाईम स्टोन गुहांसाठी प्रसिद्ध आहे. ही गुहा सर्वात खोल व मोठी अशी मानली जाते. येथे आजूबाजूला छोटी छोटी बेटेही आहेत.

'संजना बेबी' नावाची अतिशय देखणी ही लेणी फार वर्षांपूर्वी पाण्याखाली होती. ज्वालामुखीचा उद्रेक, भूस्खलन अशा नैसर्गिक आपत्तींमुळे ती जमिनीवर आली. नैसर्गिकरित्या खाऱ्या पाण्यापासून तयार झालेले हे लाईम स्टोन खरोखर निसर्गाचा चमत्कारच म्हणावा लागेल ..

ती सुंदर लेणी मनात व कॅमेरात कैद करत आम्ही तिथे जेवलो आणि बारटांग खाडीतून प्रवासाची मजा घेत घेत संध्याकाळी पुन्हा हॉटेलवर परतलो. चहापान झाल्यानंतर सगळे एकत्र जमलो. नंतर या सहलीचं खास आकर्षण असलेल्या शरद पोंक्षे काकांचं व्याख्यान झालं. स्वातंत्र्यवीर सावरकरांचा ज्वलंत हिंदुत्ववाद आणि त्यांचे विचार शरद काकांच्या वाणीतून ऐकताना अंगावर अगदी रोमांच उभे राहत होते. सहा वाजता सुरू झालेलं त्यांचं व्याख्यान रात्रीचे साडे-आठ झाले तरी संपूर्ण असं वाटत होते. या अडीच तासात आपला हिंदू धर्म किती श्रेष्ठ आहे याची जाणीव आम्हाला नक्कीच झाली.

व्याख्यान झालं तरी आम्ही त्याच मंतरलेल्या अवस्थेत असताना पार्थ दादांनी त्याच दिवशी दिल्लीत घडलेल्या खुनाबद्दल आम्हाला सांगितलं.

'मला काय करायचं?' ही आपली तटस्थ वृत्ती भविष्यात आपल्यासाठी किती घातक आहे हे अगदी पोटतिडकीने दादा आम्हाला सांगत होते. आम्हालाही ते पटत होतं. वेळ आली तर समर्थपणे शस्त्र उगारता यायला हवं. विरोध करायला यायला हवा. स्वसंरक्षण जमायलाच हवं. हा दादांचा आग्रह किती योग्य आहे याची त्यावेळी जाणीव झाली.

त्या विचारांसोबतच जेवणं उरकून आम्ही झोपी गेलो. पहाटे साडे-पाचच्या रिपोर्टिंगसाठी.

**दिवस तिसरा**

१ जून २०२३ - इथून पुढे आम्हाला मोजक्याच सामानासोबत प्रवासाला निघायचं होतं. थोडक्यात बॅग पॅकिंग करून. सकाळी साडे-पाच वाजता आम्ही 'हॅव लॉक आयर्लंड' अर्थात 'स्वराज्य द्वीप'कडे निघालो. हॉटेल टी एस जी रिसॉर्ट इथे आमची राहण्याची सोय होती. तिथून बसने क्रूझ पर्यंत आलो. (खास आरक्षित क्रूज द्वारे सुमारे दोन-अडीच तासांचा तो समुद्र प्रवास. या यात्रेतील एकूण सहा तासांच्या समुद्र प्रवासातील हा पहिला टप्पा)

सुरक्षिततेच्या दृष्टीने सर्व तपासण्या होऊन सोबत आणलेला पाकीट बंद नाश्ता करून आम्ही समुद्र प्रवासासाठी सज्ज झालो. आम्ही सगळी तरुणाई एकत्र जमलेलो. मग डीजे, डान्स, गप्पा, हास्यविनोद याला अगदी उधाण आलेलं.

अतिशय पारदर्शी व नितळ अशा त्या जलावरचा प्रवास खरोखरीच संस्मरणीय असाच होता. तेथील 'कालापत्थर' या समुद्रकिनाऱ्याला अर्थात बीचला आम्ही भेट दिली. साऱ्यांनी मिळून नुसता दंगाच केला म्हणाना! पण ऊन आणि आर्द्रता यामुळे घामाचे प्रमाण जास्त. नाही म्हटलं तरी उष्णतेचा त्रास झालाच. त्यामुळे पुन्हा रिसॉर्टला परतल्यावर सगळ्यांनी क्षणाचाही विलंब न करता तिथल्या स्विमिंग पूल मध्ये थेट उड्या घेतल्या. मनसोक्त डुंबून नंतर जेवणं झाली. संध्याकाळी चारच्या सुमारास स्वराज्य येथील जगप्रसिद्ध आणि आशिया खंडातील क्रमांक दोनचा समुद्रकिनारा म्हणून गौरवलेल्या राधानगरी या समुद्रकिनाऱ्याला आम्ही भेट दिली. पुन्हा तोच क्रम. समुद्रात डुंबण नंतर स्विमिंग पूल नंतर जेवण. रात्री पार्थ दादांचं व्याख्यान झालं.

समुद्र किनाऱ्यावर आम्ही नुकतीच धम्माल करून आलो होतो; पण पारतंत्र्याच्या काळात याच समुद्राच्या तीरावर विमनस्क मन:स्थितीत बसलेल्या स्वातंत्र्यवीर सावरकरांना जगातील सर्वोत्तम विरह काव्य सुचलं हे समजल्यावर खरोखरी थरारून जायला झालं. त्या उमलत्या वयात पुत्रशोकाचा आघात त्यांनी कसा सहन केला असेल? असा विचारही मनाला स्पर्शून गेला. अस्वस्थ मनासोबत आम्ही मुली हॉटेलवर परतलो. जेवणं झाली आणि दिवसभराच्या श्रमाने गाढ झोपी गेलो. तसा उद्या जरा उशिराच म्हणजे सकाळी साडे-आठचं रिपोर्टिंग होतं.

**दिवस चौथा**

२ जून २०२३ - जवळील बीचला आम्ही भेट दिली. दगडापासून तयार झालेली नैसर्गिक कमान पाहिली.

नितळ समुद्र पाहिला. आणि त्यानंतर शहीद येथून एका विशेष क्रूझने पोर्ट ब्लेअर शहराकडे आमचा परतीचा प्रवास सुरू झाला. पुन्हा सुमारे अडीच-तास आम्ही पाण्यावर तरंगत होतो. संध्याकाळी 'नेताजी सुभाष तिरंगा स्मृती स्थळा'ला आम्ही भेट दिली. ज्याला 'फ्लॅग पॉईंट' असेही म्हटलं जातं. सर्व परिसर पाहताना निसर्गाचं

ते देखणं रूप नजरेत आणि कॅमेरात साठवत गेलो. नंतरच पार्थ दादांचे व्याख्यान झाले. लहानपणापासून ऐकलेल्या 'जयोस्तुते' या गीताचा खरा व प्रेरक अर्थ त्यांच्या वाणीने उलगडून दाखवला. मनात त्याचीच पारायण करत आम्ही हॉटेलला परतलो.

**पाचवा दिवस**

३ जून २०२३ – सकाळी नऊ चं रिपोर्टिंग. 'रॉस आयलँड'ला भेट देण्यासाठी आम्ही निघालो. प्रवास बोटीतून होता. केंद्र शासनाने रॉस आयलँडचे नामकरण 'नेताजी सुभाषचंद्र बोस' असं नुकतंच केलं आहे. अंदमानातील पॅरिस अशी ओळख असलेल्या या बेटाला अनेक नैसर्गिक आपत्तींना तोंड द्यावे लागले. अशाच एका आपत्तीत दोनशे एकरावर पसरलेलं हे बेट पाण्याखाली गेलं आणि आता केवळ ७० एकर शिल्लक राहिलं आहे. इंग्रज राजवटीत गजबजलेल्या या बेटावर आत्ता मनुष्यवस्ती नाही. केवळ अनुराधा राव या महिला तिथे राहतात. इथल्या पशु–पक्ष्यांशी मायेने संवाद साधतात.




त्यांच्या वयाच्या तीन वर्षांपासून त्यांचे तिथे वास्तव्य आहे. एकेकाळी वैभवात असणाऱ्या या बेटाच्या दुरावस्थेबद्दल त्या सातत्याने शासनाकडे पाठपुरावा करतात. इथल्या प्राणी–जीवनाला अभय देण्यासाठी त्यांनी प्रयत्नपूर्वक इथल्या प्राण्यांची शिकार थांबवली आहे . त्यामुळेच तिथल्या मोर, खारी, हरणं यांचा मुक्त संचार हे त्यांच्या प्राणी प्रेमाचं व पर्यायाने निसर्गसंवर्धनाचं प्रतीक म्हणायला हवं. तेथील हरणांना मनसोक्तपणे ब्रेडचे तुकडे भरून त्या बागेचा आम्ही निरोप घेतला.

पुन्हा बोटीतून प्रवास करत हॉटेलवर आलो. जेवणं झाली आणि दुपारी साडे–तीन वाजता आम्ही 'सेल्युलर कारागृहात' पोहोचलो. चित्रपटात पाहिलेला, व्याख्यानात ऐकलेला, पुस्तकातून वाचलेला तो तुरुंग... ते कारागृह ...आता प्रत्यक्ष समोर होतं...

त्याची भव्यता आणि त्याचं रूप आज जरी मोहक वाटत असलं तरी स्वातंत्र्यवीर सावरकर या कारागृहात असताना ते किती दाहक असेल याचा आम्ही विचार करू लागलो. त्या तुरुंगातून फिरत असताना स्वातंत्र्यवीरांनी सोसलेल्या कष्टांना, बारीच्या त्या छळांना आम्ही आठवत होतो. कसे राहिले असतील ते या वधस्तंभासमोरील काळ कोठडीत? केवळ सात बाय अकरा फुटामध्ये !

मनात विचार सुरू असतानाच सावरकरांचा 'डी' म्हणजे डेंजर हा बिल्ला खरोखरी आमच्या गळ्यात पडला.. स्वप्न की भास.. नाही...

पोंक्षे काकांनी मुद्दाम आम्हाला तो अनुभव देण्यासाठी केलेली ही योजना होती.

आता आम्ही सगळेच 'स्वातंत्र्यवीर सावरकर' झालो होतो! काळ्यापाण्याच्या शिक्षेवर आलो होतो. राजकैदी म्हणून! आम्हाला प्रत्येकाला स्वतंत्र कोठडीत

ठेवण्यात आलं. बाहेरून कडी लावून घेण्यात आली. गळ्यात 'डी' चा बिल्ला घेऊन आता पुढील ४५ मिनिटं आम्ही त्या कोठडीत स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या भूमिकेत जाणार होतो ..

खरोखरीच काय काय, कोणते, कसे, किती विचार मनात आले त्यावेळी.

दिवसा उजेडी सुरक्षित वातावरणात असतानाही आम्ही अस्वस्थ झालो होतो. स्वातंत्र्यवीर सावरकरांची काय मन:स्थिती झाली असेल?

आमच्या या अनेक प्रश्नांना पोंक्षे काकांच्या सविस्तर विवेचनातून नंतर उत्तर मिळत गेली. हळूहळू आम्ही स्वातंत्र्यवीर सावरकर होत गेलो!

सुमारे तासाभराने आम्ही त्या मन:स्थितीतून बाहेर आलो.. स्थिरावलो..

कारागृहाच्या बाहेरील बागेजवळ आलो. तिथल्या सावरकरांच्या पुतळ्याला नमस्कार केला. तिथे त्यांना वंदन करताना दिवे लावले. त्यांच्या दोन रचना 'जयोस्तुते आणि सागरा प्राण तळमळला' यांचं करा ओके ट्रॅकवर सामूहिक पठण केलं. जणू काही देशभक्तीच्या मार्गावरील आमच्या वाटचालीतील पुढचं पाऊल या योगे प्रकाशमान व्हावं या इच्छेनेच.

त्यानंतर संध्याकाळचा चहा नाश्ता करून, सहा वाजता होणाऱ्या 'लाईट अँड साऊंड' शो ची आम्ही वाट पाहू लागलो. ५०० आसन क्षमता असलेल्या त्या हिंदी प्रयोगाने आम्हाला पुन्हा त्या कालखंडात नेलं. 'स्वातंत्र्य कधीच मिळत नसतं' ते मिळवावं लागतं, याची पुन्हा जाणीव झाली.

आम्ही हॉटेलवर आलो. आता आपली ही यात्रा संपणार.. उद्या आपण आपापल्या घरी परतणार.. पण एकंदरीतच या दिवसात मित्र-मैत्रिणींसोबत आम्ही जवळ आलो, गप्पा झाल्या, पण एक नवा दृष्टिकोन नक्कीच आम्हाला मिळाला..

स्वातंत्र्यवीरांचे काम आणि अडचणी आल्या नाहीत असं होणं शक्य नाही. दुसऱ्या दिवशी प्रचंड पाऊस. त्यामुळे आमचं विमान उड्डाण एक दिवस उशिराने झालं आणि चार जून ऐवजी आम्ही पाच जूनला मुंबईला परतलो..

घरी आल्यानंतर या सहलीचा विचार करता आमच्या लक्षात आलं की, पूर्वी आम्ही दोघीही किती चटकन कोणताही विचार न करता परधर्मीयांवर विश्वास ठेवत होतो.. कुणाशीही चटकन मैत्री करत होतो... पण आता मात्र ताकही फुंकून प्यायला हवं असं वाटू लागलेय. विचारकरून, विचारपूर्वक मैत्री करायला हवी हेही जाणवायला लागलंय. कोणाशी किती अंतर राखायचं हे भान आता आम्हाला आलंय. शेवटी आपला आत्मसन्मान आपल्यालाच जपायला हवा ना !!

वंदे मातरम !

स्वातंत्र्य लक्ष्मी की जय !!

**– कुमारी जान्हवी महेश बेडेकर**

**शब्दांकन : साधना जोशी**

•••

दिशा
नियमित
वाचा.

आपली मते जाणून घेण्यास आम्ही उत्सुक आहोत.


त्याने जे दिले आहे त्याबद्दल त्याचे आभार माना.

# अटल बोगदा : एक यशोगाथा

*भारताच्या ध्येय-धोरणांमध्ये जागरुकतेने प्रगती होत आहे. त्यात संशोधक, तंत्रज्ञानी व्यक्ती, सामान्यत्व परंतु चिकाटीचे असामान्यत्वाचे गुण असलेले कामगार यांचे श्रेय वादातीत आहे. त्यापैकीच एक 'अटल बोगदा'. ह्याची हृदयस्पर्शी माहिती सांगणारा अप्रतिम लेख. - संपादक*

३ ऑक्टोबर २०२० रोजी हिमाचल प्रदेशात भारताचे पंतप्रधान श्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते एका बोगद्याचे उद्घाटन करण्यात आले. उद्घाटनाचे कार्यक्रम तर रोजच होत असतात. परंतु हे उद्घाटन जरा वेगळ्या प्रकारचे होते. १०,००० फूट उंचीवर बांधलेल्या जगातील सर्वात लांब बोगद्याचे उद्घाटन होते ते. या बोगद्याला भारताचे माजी पंतप्रधान भारतरत्न श्री अटल बिहारी बाजपेयी यांचे नाव देण्यात आले. उद्घाटन प्रसंगी प्रसार माध्यमांनी या बोगद्यासंबंधी बरीच माहिती दिली होती. तेव्हापासून हा बोगदा पाहण्याची प्रबळ इच्छा मनात निर्माण झाली होती. ती २०२३ सालातील जून महिन्यात पूर्ण झाली. त्यावर आधारित हा लेख आहे.

हिमालय हा भारताच्या उत्तरेला असलेला एक महाकाय डोंगर असून त्यांच्या अनेक पर्वतरांगा आहेत. त्यातील काही एवढ्या उंच आहेत की, त्यांच्या शिखरावर सतत बर्फ साचलेला असतो. या डोंगरातून रस्ता बनवण्याचे काम फारच जिकीरीचे असते. बऱ्याचदा डोंगराच्या कडेकडेने वळणावळणाचे रस्ते बनवावे लागतात. त्यामुळे दोन गावांतील अंतर वाढते. त्याहीपेक्षा धोकादायक असते ते वळणदार रस्त्यांवर गाडी चालवणे. अशा रस्त्यांवर पुढून वाहन आले तरी कळत नाही! थोडेसे जरी नियंत्रण गेले तरी वाहन दरीत जाण्याची शक्यता असते! उंच डोंगरावर असलेल्या रस्त्यावर बर्फ साचण्याची शक्यता असते. त्यामुळे हिवाळ्यात असा रस्ता वाहतुकीसाठी वापरता येत नाही. यावर तोडगा काढण्यासाठी डोंगरातून जाणारा सरळ रस्ता बनविने आवश्यक असते. नेमके हेच काम अटल बोगद्याने केले आहे.



अटल बोगद्याचे आतले चित्र

हिमाचल प्रदेश राज्यातील मनाली आणि लेह या दोन शहरांना राष्ट्रीय महामार्ग ३ ने जोडले आहे. या दोन शहरांतील अंतर कमी करण्यासाठी आणि रस्ता वर्षभर सुरू ठेवण्यासाठी अनेक बोगदे बनविण्याची योजना आहे. त्यातील अटल बोगदा हा एक आहे. मनाली ते केलांग या दोन शहरांना हा बोगदा जोडतो. जुन्या मार्गाने हे अंतर ११६ किलोमीटर भरते. अटल बोगद्यामुळे हे अंतर ७१ किलोमीटर एवढे कमी झाले आहे. त्यामुळे वाहन चालकांचा त्रास कमी झाला. तसेच इंधन आणि वेळेची बचत होऊ लागली.




बोगद्याचे दक्षिणेकडील प्रवेशद्वार

मनालीवरून केलांगला जाताना रोहतांग जवळ 'पीर प्रांजल' पर्वतरांग लागते. त्यातून काढलेल्या रस्त्याला अनेक वळणे आहेत. या ठिकाणाला 'रोहतांग पास' असे म्हणतात. या वळणदार आणि अरूंद रस्त्यावरून वाहन

उषःकाल कितीही चांगला असला, तरी सूर्याला तिथे फार काळ थांबता येत नसतं !

चालविणे अत्यंत जिकिरीचे होते. अटल बोगद्यामुळे ही समस्या कायमची सुटली आहे. रोहतांग पासच्या खालीच हा बोगदा खोदण्यात आला आहे. त्याची एकूण लांबी ९.०२ किलोमीटर एवढी आहे. प्रत्येक अर्ध्या किलोमीटरवर इलेक्ट्रॉनिक फलक लावलेले आहेत. बोगद्याची रुंदी १० मीटर आहे. यातील आठ मीटर वाहनांच्या वाहतुकीसाठी वापरली आहे. त्यावरून एका वेळेस दोन मोठी वाहने जाऊ शकतात. त्यांच्या दोन्ही बाजूला एकेक मीटरची पायवाट ठेवली आहे. संपूर्ण बोगद्यात विजेचे दिवे लावलेले आहेत. बोगद्यात हवा खेळती राहावी यासाठी व्यवस्था केली आहे. एवढेच नव्हे तर, त्यातील हवेची गुणवत्ता तपासणारी यंत्रणा उभारण्यात आली आहे. जागोजागी कॅमेरे बसविले आहेत. त्यांच्या मदतीने आतील हालचालींवर नजर ठेवता येते. बोगद्यातून जाणाऱ्या वाहनाला अचानक आग लागलीच तर त्याचे नियंत्रण करता यावे यासाठी जागोजागी अग्निशमन यंत्रणा उभारण्यात आली आहे. एकंदरीत सांगायचे झाले तर, सर्व सुविधांनी सुसज्ज असा हा आधुनिक बोगदा आहे. त्यातून प्रवास करणे म्हणजे एक आनंददायी अनुभव घेणे होय. बोगद्यात वाहनांचा वेग ताशी ६० ते ८० किलोमीटर ठेवावा असे सुचविण्यात आले आहे. बोगदा पार करायला साधारणपणे १० मिनिटांचा कालावधी लागतो.




**बोगद्याचे उत्तरेकडील प्रवेशद्वार**

अटल बोगद्यातून प्रवास केल्यानंतर मी त्यासंबंधी अधिक माहिती मिळविण्याचा प्रयत्न करू लागलो. बोगद्यातून वाहतूक जरी २०२० मध्ये सुरू झाली तरी त्याची सुरुवात मात्र २० वर्षांपूर्वी झाली होती. ३ जून २००० रोजी भारताचे माजी पंतप्रधान श्री अटल बिहारी वाजपेयी यांनी हा बोगदा बांधण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार कामाला सुरुवात देखील झाली. परंतु कामात अनेक अडथळे आले. पहिली अडचण होती ती वातावरणाची. हिवाळ्यात या परिसरात मोठ्या प्रमाणावर हिमवर्षाव होतो. त्यावेळेस तिथे काम करणे फारच कठीण असते. दुसरी अडचण होती ती तेथील मृदा प्रकाराची. हिमालय पर्वताची माती भुसभुशीत आहे. त्यामुळे तिथे काम करणे अत्यंत धोक्याचे आहे. बऱ्याचदा या परिसरात वरून दगड कोसळतात. अशाच एका घटनेत अनेक मजूरांना आपला जीव गमवावा लागला होता. त्याहीपेक्षा अडचणीचे होते ते बोगदा खोदण्याचे काम. अशा कामांसाठी साधारणपणे बोगदा करणारे यंत्र वापरले जाते. परंतु या यंत्राचा वापर करणे तिथे अशक्य होते. त्याऐवजी लहान लहान स्फोट घडवून आणून त्यातून सैल झालेली माती बाहेर काढावी लागली. हे अर्थातच वेळ घेणारे काम आहे. अशा अनेक अडचणींवर मात करीत आपल्या तंत्रज्ञांनी हे काम पूर्ण करून दाखवले आहे. बोगदा खोदण्याचे काम एकाच वेळेस दोन बाजूंनी करण्यात आले. उत्तर दिशेला हिमवर्षाव जास्त होत असल्याने तिकडून एक चतुर्थांश एवढाच भाग खोदता आला. उरलेल्या तीन चतुर्थांश भागाचे काम दक्षिण बाजूकडून करण्यात आले. विशेष हे की, दोन बाजूंनी काम करणारे तंत्रज्ञ ठरावीक कालावधीनंतर एकमेकांशी हात मिळवू शकले.

अटल बोगद्यातून प्रवास करणे हा एक अविस्मरणीय अनुभव आहे. आपण देखील स्वतःच्या भरवशावर अशी मोठमोठी कामे करू शकतो याची जाणीव होते. सीमा रस्ता संघटना (Border Road organization) अशी अनेक धाडसी कामे करीत असते. त्यांचे कौतुक करावे तेवढे कमीच. या बोगद्यात असलेल्या न्यूट्रिनो कणांचा अभ्यास करण्याची योजना मुंबईच्या टाटा मूलभूत संशोधन संस्थेने आखली आहे असे मला कळले. त्यांच्या या संशोधन कार्याला नक्कीच यश प्राप्त होईल याची मला खात्री आहे.

**– डॉ. सुधाकर आगरकर**

स्त्री ही क्षणाची पत्नी आणि अनंतकाळाची माता असते.

# नमो सदा श्री नृसिंहसरस्वती महाराज
## (भाग – १)

*श्री दत्तसंप्रदायात श्री नृसिंहसरस्वती महाराज यांचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. त्यांच्या भक्तांन त्यांच्या विषयीचे अनुभव एकूणच जीवन जगताना उत्तमरित्या येतात. अशा ह्या व्यक्तिमत्त्वाविषयीची माहिति सर्वांनाच प्रेरणादायी ठरेल... – संपादक*

श्री नृसिंहसरस्वती यांचा जन्म सुमारे १३७८ साली अकोला जिल्ह्यातील लाडकारंजे या गावी झाला. अकोला जिल्ह्याचे विभाजन होऊन वाशीम हा जिल्हा निर्माण झाला. त्यामुळे सध्या हे गाव वाशीम जिल्ह्यात येते. नृसिंहसरस्वती हे दत्तात्रेयांचा कलियुगातील दुसरा अवतार मानले जातात. श्रीपाद श्रीवल्लभांनी कुरवपूरला अंबिका या ब्राह्मण विधवेस वर दिलेला असतो की, पुढील जन्मी ते तिचा पुत्र म्हणून जन्म घेतील. लाडकारंजाची अंबाभवानी ही तिच पूर्वजन्मीची अंबिका होय व तिच्या पोटी जन्मलेला पुत्र नृसिंहसरस्वती हे श्रीपाद श्रीवल्लभ म्हणजेच दत्तात्रेयांचा अवतार होय असे दत्तभक्त मानतात. जन्म झाल्यापासून मुंज होईपर्यंत त्यांचे वास्तव्य लाडकारंजातच होते. श्री वासुदेवानंदसरस्वती व श्री ब्रह्मानंदसरस्वती यांच्यामुळे या पवित्र ठिकाणाची महती सर्वदूर पसरण्यास मदत झाली. श्री वासुदेवानंदसरस्वती यांना देखील दत्तभक्त दत्तात्रेयांचा अवतार मानतात. त्यांचे गोत्र वसिष्ठ होते व वाजसनेयी ब्राह्मण होते. त्यांच्या वडिलांचे नाव माधव तर आईचे नाव अंबाभवानी होते. नृसिंहसरस्वती यांच्याविषयीची माहिति आपणास गुरूचरित्र या ग्रंथाद्वारे मिळते. सरस्वती गंगाधर हे गुरूचरित्रातचे रचेते म्हणून ओळखले जातात. साधारणपणे १५३८ सालात सरस्वती गंगाधर यांनी गुरूचरित्र हा ग्रंथ लिहिला असे अभ्यासक म्हणतात. ते कडगंजी या गावचे होते. कडगंजी हे गाव कर्नाटकातील कलबुर्गी या जिल्ह्यात आहे. कलबुर्गी हा जिल्हा गुलबर्गा या नावाने ओळखला जात असे. परंतु याचे पूर्वाचे नाव कलबुर्गी असेच होते असे अभ्यासकांचे मत आहे. असे म्हटले जाते की, नृसिंहसरस्वतींचे सायंदेव, नंदिनामा, नरहरी व सिद्धमुनी हे जवळचे चार शिष्य होते. असे म्हटले जाते की, यापैकी सिद्धमुनी हे श्री नृसिंहसरस्वतीं सोबत त्यांच्या छायेप्रमाणे नेहमी असत. या सिद्धमुनींचा एक शिष्य होता. त्याचे नाव नामधारक असे होते. सिद्धमुनी श्री नृसिंहसरस्वतींच्या सोबत सतत वावरत असल्यामुळे त्यांना स्वामींच्या दिव्यशक्तीची व ज्ञानाची, तसेच इतर अनेक बाबींची प्रचीती सातत्याने आलेली होती. त्यांना आपल्या गुरूंच्या दिव्यत्वाचा जो अनुभव आला तो ते आपला शिष्य नामधारक यास कथन करत असत. अभ्यासकांच्या मते सरस्वती गंगाधर यांनी सिद्धमुनी व त्यांचे शिष्य नामधारक यांच्यातील संवाद डोळ्यांसमोर ठेवूनच गुरूचरित्र या ग्रंथाची निर्मिती केली.

सरस्वती गंगाधर हे आपस्तंब शाखेतील कौंडिण्य गोत्राचे ब्राह्मण होते व त्यांचे आडनाव साखरे असे होते. याबाबतचा उल्लेख गुरूचरित्रात सरस्वती गंगाधर यांनी पुढीलप्रमाणे केला आहे–''आपस्तंब शाखेसी। गोत्र कौंडिण्य महाऋषी। साखरें नाम ख्यातिसी। सायंदेवा पा साव।।'' अभ्यासकांच्या मते गुरूचरित्राप्रमाणेच शिवरात्री माहात्म्य व श्री नृसिंहसरस्वती स्तोत्र या दोन ग्रंथांचे कर्ते देखील सरस्वती गंगाधर हेच असावेत. सरस्वती गंगाधर यांची कानडी ही मातृभाषा होती. ते आपली वंशावळ पुढीलप्रमाणे सांगतात – सायंदेव, नागनाथ, देवराव व गंगाधर. सायंदेव साखरे हे सरस्वती गंगाधरांचे पणजोबा होते. ते सध्याच्या तेलंगणातील

आदिलाबाद जिल्ह्यातील बासर (वासरब्रह्मेश्वर) येथे यवन राजाच्या अंमलात कामाला होते. त्यांची मातृभाषा कानडी असली तरी त्यांनी गुरूचरित्र मराठीत लिहिले. ते हा ग्रंथ फक्त गुरूंच्या म्हणजेच श्री नृसिंहसरस्वतींच्या कृपेमुळेच गुरूचरित्र मराठीत लिहू शकले असे पदोपदी नमूद करतात. सरस्वती गंगाधरांनी गुरूचरित्राच्या पहिल्या अध्यायात स्वतःविषयी म्हटले आहे की, 'भाषा न ये महाराष्ट्र'.

असे म्हटले जाते की, श्री नृसिंहसरस्वतींच्या पादुका तीन ठिकाणी आहेत. ही तीन ठिकाणे म्हणजे औदुंबर, नरसोबाची वाडी व गाणगापूर ही होत. औदुंबर हे पवित्र स्थळ सांगली जिल्ह्यात कृष्णा नदीच्या काठी आहे. असे म्हणतात की, इसवीसन १४४१ साली येथे श्री नृसिंहसरस्वती यांनी चर्तुमास केला होता. हे ठिकाण अतिशय नयनरम्य व शांत आहे. येथे वृक्षवल्ली व कृष्णेचा तट असल्यामुळे येथे प्रफुल्लित वाटते व मन:शांती लाभते. साक्षात श्री नृसिंहसरस्वतींच्या पुनीत पावलांनी पावन झालेली असल्यामुळे येथे एका वेगळ्याच अनुभूतीची प्रचीती येते. येथे जनार्दनस्वामींना व संत एकनाथांना दत्तदर्शन झाले होते असे म्हणतात. औदुंबर हे ठिकाण सांगली जिल्ह्यातील पलूस या तालुक्यात आहे. पुण्याहून कोल्हापूरला जाणाऱ्या लोहमार्गावर भिलवडी स्टेशनला उतरून येथे जाता येते. भिलवडी रेल्वे स्टेशन पासून बसने गेल्यास औदुंबर साधारणपणे सात किलोमीटर अंतरावर आहे.

श्री नृसिंहसरस्वतींचे श्री नृसिंहवाडी येथे बारा वर्षं वास्तव्य होते. येथे त्यांच्या मनोहर पादुका आहेत. दत्तगुरूंचे अवतार मानले गेलेल्या श्री वासुदेवानंद सरस्वती यांनी या पवित्र ठिकाणाला भेट दिली होती. त्यांनी या स्थळाला 'दत्तात्रेयांची राजधानी' असे म्हटले होते. त्यामुळे दत्तगुरूंचे भक्तगण श्री क्षेत्र नृसिंहवाडीला दत्तप्रभूंची राजधानी म्हणतात.

श्री नृसिंहसरस्वती यांचा जन्म इसवीसन १३७८ मध्ये लाडकारंजे येथे झाला हे आपण पाहिलेलेच आहे. लाडकारंजेला 'कारंजा' असे देखील म्हणतात. अवघ्या दहा वर्षांच्या काळात म्हणजेच १३८८ साली त्यांनी संन्यासाची दीक्षा घेतली. संन्यास घेतल्यानंतर ते पवित्र स्थळांच्या तीर्थयात्रेस निघाले. साधारणपणे १४२१ च्या आसपास ते औदुंबर येथे आले. १४२२ ला श्री नृसिंहसरस्वती कृष्णा व पंचगंगेच्या संगमावर असलेल्या ठिकाणी आले व तपश्चर्या केली. दत्तसंप्रदायातील भक्तांना प्रिय असलेले हेच ते पवित्रस्थळ म्हणजे नरसोबाची वाडी. हा संपूर्ण परिसर कृष्णा व पंचगंगा माईंच्या सुंदर जलधारेमुळे नयनरम्य झालेला आहे. येथे खरोखरीच मन शांत होते व आपसूकच भक्तगणांना परम परमेश्वराच्या येथील अस्तित्वाची अनुभूती येते. या ठिकाणी दत्तसंप्रदायातील अनेक महान विभूतींनी काही ना काही काळ वास्तव्य करून तप व ध्यानधारणा केलेली आहे तसेच भक्तांना दत्तगुरूंचे महिमा वर्णून कृपाप्रसादाचा लाभ दिला आहे. नरसोबाची वाडी म्हणजे दत्तभक्तीचा जिवंत झरा होय. येथे सकाळी काकड आरती पासून दत्तगजराची सुरुवात होते ते रात्रीपर्यंत पंचामृताचा अभिषेक, महापूजा, धूपदीप आरती, दत्तपालखी सोहळा असे विविध कार्यक्रम होत असतात. नरसोबाच्या वाडीला श्री नृसिंहसरस्वती स्वामींची जयंती, तसेच श्रीरामनवमी असे सण उत्साहाने साजरे होतात.

येथे श्री नृसिंहसरस्वती औदुंबर वृक्षाखाली तपश्चर्या करत असत. ते कृष्णामाईच्या पैलतीरावर असलेल्या अमरापूर या गावी जाऊन भिक्षा मागत असत. श्री नृसिंहसरस्वतींच्या येथील वास्तव्यामुळेच या ठिकाणाला श्री क्षेत्र नृसिंहवाडी असे नाव पडले. नृसिंहवाडी येथे येऊन श्री नारायण स्वामी, श्री गोपाळ स्वामी, श्री मौनी स्वामी, श्री वासुदेवानंद सरस्वती आदि दत्तसंप्रदायातील विभूतींनी ध्यानधारणा केली होती व आपल्या येथील

मोहाचा पहिला क्षण ही पापाची पहिली पायरी असते !

वास्तव्याने भक्तांना व स्थानिकांना उपकृत केले होते. श्री वासुदेवानंदसरस्वती यांनी दत्तसंप्रदायातील भक्तांना विविध प्रकारचे दत्तसाहित्य रचून सुंदर मेजवानी दिली आहे. यात संस्कृत भाषेतील ग्रंथांचा तसेच विविध स्तोत्रांचा समावेश आहे. त्यांचे बरेचसे साहित्य गुळवणी महाराजांनी प्रसिद्ध केले आहे.

दत्तसंप्रदाय हा हिंदू धर्मातील एक महत्त्वाचा संप्रदाय होय. या संप्रदायाचे अनुयायी भारतभर आढळतात. गुजरात, महाराष्ट्र व कर्नाटक राज्यांमध्ये दत्तसंप्रदायाशी संबंधित गिरनार, माहुर, औदुंबर, नरसोबाची वाडी, अक्कलकोट, गाणगापूर, कुरवपूर आदि दत्तगुरूंची प्रसिद्ध स्थाने ही गुजरात, महाराष्ट्र व कर्नाटक अशा राज्यांमध्ये आहेत. दत्तगुरूंच्या भारतभरातील विविध पवित्र स्थळांची चर्चा करत असताना आंध्रप्रदेशातील कर्दळीवनाचा उल्लेख करणे क्रमप्राप्त ठरते. हे ठिकाण कृष्णा नदीच्या प्रवाहातच आहे. येथेच श्री श्रीपाद वल्लभ समाधिस्थ झाले होते व दत्तगुरूंचे कलियुगातील दुसरे अवतार श्री नृसिंहसरस्वती हे देखील वृक्षाखाली तपश्चर्या करत अदृश्य झाले असे म्हणतात. नंतर अनेक वर्षांनी त्याच वृक्षावर लाकूडतोड्याने घाव घातल्यावर स्वामी समर्थ प्रकटले असे दत्तभक्त मानतात. स्वामी समर्थांना, 'महाराज कुठून आलात?' असे विचारल्यावर ते म्हणाले होते, 'कर्दळीवनातून आलो.' अशाप्रकारे दत्तसंप्रदायात कर्दळीवनात अनन्यसाधारण महत्त्व आहे.

नृसिंहवाडी विषयीची एक प्रसिद्ध कथा दत्तभक्तांमध्ये सांगितले जाते. ही कथा पुढीलप्रमाणे आहे. या परिसरात भैरव भट्ट नावाचे भारद्वाज गोत्रातील ऋग्वेदी ब्राह्मण रहात असत. ते आसपासच्या गावांचे जोशी होते, म्हणजेच ते येथील पौरोहित्य करत असत. एकवीरा माता त्यांची कुलस्वामिनी होती. त्यांना कृष्णा पंचगंगेच्या संगमावर वृक्षवल्लींच्या सानिध्यात औदुंबराखाली एकाग्रचित्ताने ध्यानधारणा करणारे तेज:पुंज स्वामी दिसत. हे स्वामी म्हणजेच श्री नृसिंहसरस्वती होते. आलसचे भैरव भट्ट हे स्वामींना पाहून श्रद्धेने हात जोडत व त्याचक्षणी श्री नृसिंहसरस्वती 'नारायण' असे म्हणत. हा नित्यक्रम अनेक दिवस चालू होता. भैरव भट्ट हे स्वामींना प्रणाम करत व स्वामी 'नारायण' असा उद्घोष करत असत. या दोहोंमध्ये दुसरा कुठलाच संवाद होत नसे. श्री नृसिंहसरस्वतींचे रूप सुंदर होते. नाक तरतरीत होते. कपाळावर भस्माचे त्रिपूंड असे. ते भगवी वस्त्र परिधान करत असत. भैरव भट्ट घरी परतल्यानंतर कृष्णाकाठच्या दिव्यस्वरूप स्वामींविषयी सांगत असत. एकेदिवशी भैरव भट्ट शिरोळहून आलासला परत चालले होते. त्या दिवशी त्यांना उशीर झाला. श्री नृसिंहसरस्वती त्यावेळेस सायंसंध्या करत होते. भैरव भट्टांनी सुद्धा तेथे संध्या केली. त्यानंतर श्री नृसिंहसरस्वतींनी भैरवभट्टांना रात्रीस तेथेच मुक्काम करावा असे सांगितले. भैरवभट्टांनी आपल्या. पत्नीशी सल्लामसलत करून त्यांनी नृसिंहसरस्वती महाराजांसोबत तेथेच राहण्याचा निर्णय घेतला.

भाविकांच्या मते नृसिंहवाडीतील प्रत्येक दिवस म्हणजे मंगल दिन होय. श्री नृसिंहसरस्वतींच्या बारा वर्षांच्या निवासाने या ठिकाणाची पवित्रता द्विगुणित झालेली आहे. त्यामुळे येथील प्रत्येक क्षण पुण्यमय असतो. परंतु गुरू ग्रह कन्या राशीत गेल्यावर येथे संपूर्ण वर्षभर पुण्यसमय असतो अशी भक्तांची श्रद्धा आहे. याला 'कन्यागत महाकाल' असे देखील म्हणतात. साधारणपणे बारा वर्षांनंतर कन्यागत महापर्वकाल समयी मोठा सोहळा साजरा केला जातो. या पवित्र काळात येथे गंगा नदी श्रीक्षेत्र नृसिंहवाडीत अवतरते अशी दत्तभक्तांमध्ये श्रद्धा आहे. यावेळेस देव्हाऱ्यातील मूर्तीला पवित्र गंगाजलाने अभिषेक केला जातो. शुक्लतीर्थावर हे शाहीस्नान संपन्न होते. या ठिकाणी शुक्ल, पापविनाशी, सिद्ध, अमर, कोटी, शक्ती, प्रयाग, संगम आदि पवित्र तीर्थे आहेत. भक्तगण असे मानतात की, पंचगंगा व

कृष्णेच्या या पवित्र संगमावर साक्षात काशी विश्वेश्वराचा वास होतो. त्यामुळे येथे वर्षभर श्रद्धाळू हिंदूंची रीघ असते. तसेच पैलतीरावर चौसष्ट योगिनींचा निवास असतो अशी मान्यता आहे. येथे कृष्णावेणी मातेचा उत्सव दहा दिवस साजरा केला जातो.

भैरवभट्टांना शके १३५६ मध्ये (अर्थात इसवीसन १४३४) आश्विन वैद्य द्वादशीला श्री नृसिंहसरस्वतींनी नृसिंहवाडी येथे मनोहर पादुका प्रकट केल्या. तद्नंतर त्यांनी भैरवभट्टांना या मनोहर पादुकांचे मनोभावे पूजन करावयास सांगितले. त्यांनी भैरवभट्टांना व त्यांच्या पत्नीला पुत्रप्राप्तीचा वर दिला, तसेच त्यांचे जीवन अतिशय सुखी व समाधानी व्यतीत होईल असा आशीर्वाद दिला. आश्चर्याची बाब म्हणजे, जेरे दांपत्याचे वय ऐंशी व साठीच्या घरात असले तरी त्यांना पुत्रप्राप्ती झाली. श्री नृसिंहसरस्वती स्वामींनीं दिलेल्या दिव्य वरामुळेच हा चमत्कार झाला. यानंतर श्री नृसिंहसरस्वती गाणगापुरास प्रस्थान करावयास निघाले. परंतु परम स्वामी भक्त भैरवभट्टांनी त्यांना काहीकाल नृसिंहवाडीतच राहण्याची विनंती केली. त्याप्रमाणे माघ वैद्य शके १३५६ पर्यंत स्वामीजी तेथे राहिले व पंचमीला गोपाळकाला झाल्यानंतर ते श्री क्षेत्र नृसिंहवाडी येथून गुप्त होऊन गाणगापुरास प्रकटले.

दत्तभक्तांची मनोकामना असते की, त्यांनी जीवनात एकदा तरी श्री क्षेत्र नृसिंहवाडीस जावे व साक्षात दत्तगुरूंच्या तेथील वासाचा ब्रह्मानंद लुटावा. मनुष्याला या जीवनात सर्व दु:ख विसरून खरी सुखशांती प्राप्त होण्याचे पवित्र ठिकाण म्हणजे नृसिंहवाडी होय अशी दत्तभक्तांची निस्सीम श्रद्धा आहे. याची प्रचीती खालील ओळींवरून येते.

सुखासाठी करिसी तळमळ ।
तरी तू वाडीस जाई एक वेळ ।
मग तू अवघाची एकरूप होसी ।
जन्मोजन्मींचे दु:ख विसरसी ।।

नृसिंहवाडीवरून श्री नृसिंहसरस्वती गाणगापूरमध्ये प्रकट झाले असे दत्तभक्त मानतात. त्यामुळे गाणगापूरचे दत्तसंप्रदायात अनन्यसाधारण महत्त्व आहे. गाणगापूर हे ठिकाण कर्नाटक राज्यातील कलबुर्गी (आधीचे गुलबर्गा) या जिल्ह्यात आहे. सोलापूर व गुलबर्गा या दोन रेल्वे स्टेशनांच्या मध्ये गाणापूर रोड हे रेल्वे स्टेशन आहे. येथून साधारणपणे वीस किलोमीटर एवढ्या अंतरावर भीमा व अमरजा या दोन नद्यांच्या संगम काठावर हे पवित्र तीर्थक्षेत्र आहे. श्री नृसिंहसरस्वती यांचे गाणगापूर येथे बावीस ते तेवीस वर्षे वास्तव्य होते. दत्तभक्तांना या स्थानाविषयी अद्वितीय असे प्रेम व जिव्हाळा आहे. भक्तगणांचे या पवित्र स्थळाविषयी असे मत आहे की, येथे आल्यानंतर भाविकांच्या विविध व्याधींचा नाश होतो. तसेच, त्यांना असणाऱ्या बाधींचे निरसन होते. गाणगापूरची भूमी श्री नृसिंहसरस्वती यांच्या सहवासाने पावन झालेली भूमी आहे. येथे त्यांनी विविध लीला दाखवल्या अशी मान्यता आहे. दत्तगुरूंचे दुसरे अवतार श्री नृसिंहसरस्वती यांनी येथे अनुष्ठान केलेले असून, श्रद्धेने आराधना केल्यास या ठिकाणी साक्षात दत्तात्रेयांचे दर्शन घडते असे भक्तगण मानतात. श्री क्षेत्र गाणगापूर येथे श्री नृसिंहसरस्वती स्वामींनीं स्थापन केलेल्या निर्गुण पादुका आहेत. दत्तभक्त असे मानतात की, भगवान दत्तात्रेय भीमा व अमरजा या नद्यांच्या पवित्र संगमावर स्नान करतात आणि माहूरला निद्रा घेतात.

गाणगापुरातील आठ तीर्थे प्रसिद्ध आहेत. या तीर्थांचा महिमा भक्तगण खालीलप्रमाणे वर्णितात:

**भागीरथी तीर्थ:** या तीर्थाविषयी असे म्हटले जाते की, गंगा नदीत ज्याप्रमाणे स्नान केल्यानंतर जे पुण्य प्राप्त होते त्याप्रमाणे पुण्य मिळते व दारिद्र्य नष्ट होते.

हिमालयात गंगोत्री येथे गंगेचा उगम होतो तेथे तिला 'भागीरथी' असे म्हणतात. याविषयीची पौराणिक कथा अशी की, भगीरथाने खडतर तपश्चर्या करून गंगेला स्वर्गातून पृथ्वीवर अवतरण्यास भाग पाडले व भगवान शिवाने तिला हिमालयात आपल्या जटांमध्ये घेतले. हिमालयातून भगीरथाने तिला बंगालपर्यंत नेले व तिच्या पवित्र जलाने आपल्या पूर्वजांना मुक्ती दिली. गाणगापूर येथील भागीरथी तीर्थाला अशाप्रकारे गंगा नदीच्या जलाप्रमाणे धार्मिक महत्त्व आहे.

**पाप विनाशी तीर्थ:** नावाप्रमाणेच या तीर्थात स्नान केल्यावर मनुष्याचे जन्मोजन्मीचे पापक्षालन होते अशी दत्तसंप्रदायात मान्यता आहे. ज्याप्रमाणे गवताला आग लागल्यानंतर ते जळून खाक होते त्याप्रमाणे येथे आंघोळ केल्यानंतर पाप भस्म होऊन जाते असे भक्तगण मानतात व मोठ्या भक्तिभावाने पाप विनाशी तीर्थात स्नान करतात.

**रूद्रपाद तीर्थ :** या तीर्थातील पवित्र स्नानाने मोक्षप्राप्ती होते अशी श्रद्धा आहे.

**चक्रतीर्थ :** या तीर्थानजीक केशवाचे (भगवान विष्णू) मंदिर आहे. येथील स्नानामुळे पुत्रप्राप्ती तर होतेच, त्याचप्रमाणे अज्ञानी मूढ व्यक्तीस देखील ज्ञान प्राप्ती होते.

**कोटीतीर्थ :** या तीर्थाच्या नावाप्रमाणे येथे आपणास जमेल तेवढे दान केले तरी कोटी दान केल्याचे पुण्य मिळते असे भक्तगण मानतात. तसेच येथे स्नान केल्यावर मोक्षप्राप्ती होते अशी श्रद्धा आहे.

**मन्मथतीर्थ :** येथे स्नान करून कल्लेश्वराचे पूजन करून दर्शन घेतल्यावर वंशाची वृद्धी होते व ऐश्वर्य प्राप्त होते.

**षट्कळ व नृसिंह तीर्थ :** या तीर्थांमधील स्नानामुळे मनुष्य शतायुषी होतो. तसेच प्रयाग येथील (उत्तर प्रदेश) गंगा, यमुना व सरस्वती या तीन पवित्र नद्यांच्या त्रिवेणी संगमात जे काही पुण्य व फळ मिळते ते सर्व पुण्य व फळ येथील स्नानाने मिळते. त्यामुळे ज्या भक्तांना प्रयागला जाणे शक्य होत नाही ते गाणगापुरातील या पवित्र तीर्थात स्नान करतात.

गाणगापूर अशाप्रकारे नृहसिंहसरस्वतींच्या येथील वासामुळे एक पुण्यभूमी झाल्याचे मानले जाते.

या पवित्र स्थळाचे महात्म्य श्री गुरुचरित्रात खालीलप्रमाणे वर्णन केले आहेः

श्री गुरुनृसिंह सरस्वती । अवतार असे त्रिमूर्ती
गाणगाग्रामी असे ख्याती । जे जाती तया स्थाना
तात्काळ होती मनोकामना । काही न करो हो
अनुमाना प्रत्यक्ष देव तेथे असे ।।

वरील ओळींचा असा अर्थ होतो की, श्री नृसिंहसरस्वती गुरू हे साक्षात त्रिमूर्ती दत्तात्रेयांचा अवतार असून, तेथे त्यांचा वास असून, या पवित्र स्थळाला जे भेट देतील त्यांच्या मनीच्या इच्छा तात्काळ पूर्ण होतात कारण तेथे प्रत्यक्ष देव म्हणजेच भगवंत राहतात.

(क्रमशः)

**– सहा. प्राध्यापक सुभाष गंगाराम शिंदे**
उपप्राचार्य व इतिहास विभागप्रमुख
विप्रमंचे जोशी-बेडेकर (स्वायत्त), महाविद्यालय,
ठाणे (पश्चिम)- ४००६०६
भ्रमणध्वनी : ९८२०३२८२२६
Email : subhashinscotland@gmail.com

●●●

# परिसर वार्ता

**- संकलित**

## विद्या प्रसारक मंडळ

### विद्या प्रसारक मंडळाच्या क्रीडा अकादमी अंतर्गत शाळा व महाविद्यालय परिसरात क्रिकेट व फुटबॉल खेळासाठी बनविलेले कृत्रिम मैदान (टर्फ)

विद्या प्रसारक मंडळ मागील ८८ वर्षांपासून आपल्या विविध शाळा व महाविद्यालयां मार्फत ज्ञानदानाचे कार्य करीत आहे. शाळा – महाविद्यालयीन शिक्षणाबरोबरच, संस्था काळानुरूप व्यावसायीक अभ्यासक्रम देखील राबवित आहे. मंडळाच्या या शैक्षणिक संस्थांचे अनेक माजी विद्यार्थी आज विविध क्षेत्रात मानाचे पद भुषवित आहेत वा व्यावसायीक तथा उद्योजक म्हणून नावाजले आहेत. तसेच काही माजी विद्यार्थी तर परदेशी स्थायिक झाले आहेत. यावरूनच मंडळाच्या शैक्षणिक संस्थांची गुणवत्ता सिद्ध होत आहे.



शाळेतील 'टर्फ' सुविधेचे उद्‌घाटन करताना संस्थेचे विश्वस्त व कार्याध्यक्ष डॉ. विजय वासुदेव बेडेकर

परंतु पुस्तकी शिक्षणाशिवाय संस्थेच्या विद्यार्थ्यांनी क्रीडा स्पर्धांमध्ये देखील अग्रेसर राहावे असा संस्थेचा मानस आहे. सबब विद्यार्थ्यांच्या क्रीडा गुणांना वाव मिळवून देण्यासाठी, संस्थेचे विश्वस्त व कार्यकारिणी सभासद डॉ. महेश विजय बेडेकर यांच्या संकल्पनेतून सन २०२१ मध्ये विद्या प्रसारक मंडळाची क्रीडा अकादमी (VPM's Sports Academy) स्थापन करण्यात आली. या अकादमी–मार्फत विद्यार्थ्यांना क्रीडा प्रशिक्षण देऊन, त्यांना विविध स्पर्धांसाठी तयार करण्यात येते, शिवाय त्यांना योग्य ते मार्गदर्शन देऊन आंतरशालेय व आंतरमहाविद्यालयीन तसेच तालुका, जिल्हा, राज्य, देश व आंतरराष्ट्रीय पातळींवरील स्पर्धांसाठी उद्युक्त करण्यात येते.

डॉ. महेश विजय बेडेकर यांच्या पुढाकाराने सन २०२२ मध्ये मंडळाच्या क्रीडा अकादमी अंतर्गत ठाणे महाविद्यालय परिसरातील मैदानावर, मंडळाने मे. लेनो स्पोर्टस इंडिया यांच्या सहाय्याने सुमारे रु. ७५ लाख खर्च करून, क्रिकेट व फुटबॉल खेळासाठी कृत्रीम मैदान (टर्फ) बनविले आहे. सदर टर्फ सुविधेच्या कामाचे भूमीपूजन दि.२२.१०.२०२२ रोजी धनत्रयोदशीच्या शुभदिनी डॉ. महेश वि. बेडेकर यांचे हस्ते करण्यात आले, तर या टर्फ सुविधेचे औपचारिक उद्‌घाटन माहे डिसेंबर २०२२ मध्ये करण्यात आले. या कृत्रिम मैदान (टर्फ) च्या सुविधेस महाविद्यालयीन विद्यार्थी, तसेच बाहेरील व्यक्ती वा आस्थापनांकडून देखील उत्तम प्रतिसाद मिळत आहे.



मंडळाच्या ठाणे महाविद्यालयातील टर्फ प्रमाणेच, शालेय विद्यार्थ्यांसाठी मंडळाच्या शाळा परिसरात देखील डॉ. महेश वि. बेडेकर यांच्या पुढाकाराने व मे. लेनो स्पोर्टस इंडिया यांच्या सहाय्याने सुमारे रु.२० लाख खर्च करून कृत्रीम मैदान (टर्फ) बनविण्यात आले आहे. शाळेतील या टर्फ सुविधेचे उद्‌घाटन मंगळवार, दि. २७.०६.२०२३ रोजी संस्थेचे विश्वस्त व कार्याध्यक्ष डॉ. विजय वासुदेव बेडेकर यांचे शुभहस्ते करण्यात

आले. सदर प्रसंगी संस्थेचे विश्वस्त व कार्यकारिणी सभासद डॉ. महेश विजय बेडेकर तथा मंडळाच्या शाळा महाविद्यालयाचे प्रमुख व मंडळाचे कार्यकारिणी सभासद उपस्थित होते. शाळेतील या कृत्रिम मैदान (टर्फ) वर शाळेतील विद्यार्थ्यांसाठी व्यावसायिक प्रशिक्षकांमार्फत प्रशिक्षण देण्यात येत आहे.

मंडळाच्या क्रीडा अकादमी अंतर्गत शाळा व महाविद्यालय परिसरात विविध क्रीडा प्रशिक्षकांद्वारे क्रिकेट, फुटबॉल, ॲथलेटिक्स्, स्केटींग, बुद्धीबळ व बास्केटबॉल इ. खेळांचे प्रशिक्षण दिले जात आहे. मंडळाच्या या विद्यार्थ्यांमधून ऑलिम्पीक स्तरावरचे खेळाडू निर्माण करण्याचा डॉ. महेश बेडेकर यांचा मानस आहे.

## डॉ. बेडेकर विद्या मंदिर, माध्यमिक विभाग

दि. २६ जून २०२३ रोजी महाराष्ट्र नेवल एन. सी. सी. मुंबई युनिट – ब मधून पी. आय स्टाफ श्री. सोनवणे सर व श्री. कोलेकर सर यांनी शाळेला भेट दिली. एन. सी. सी. कॅडेट्सना छान मार्गदर्शन करून परेड करून घेतली. कॅडेट्सना डिफेन्स करियर बद्दल भविष्यातील संधीची माहिती दिली. एन. सी. सी. कॅडेट्सचा प्रतिसाद, अनुशासन व कार्याचे नियोजन याची सरांनी प्रशंसा केली. मा. मुख्याध्यापिका व शिक्षकांचा युनिटसाठी असलेला प्रतिसाद चांगला होता.







**आंतरराष्ट्रीय योगदिन –** घंटाळी मित्र मंडळाच्या योगप्रबोधिनीच्या योग शिक्षिका सौ. काटदरे, सौ. गाला, सौ. सुरेखा चिकटे यांनी योगदिनाचे महत्त्व सांगून विद्यार्थ्यांकडून विविध योगासने करून घेतली. इ. ६ वी ते १० वी सर्व विद्यार्थ्यांनी ओंकारने सुरुवात करून ताडासन, वृक्षासन, पर्वतासन, उष्ट्रासन इ. अनेक योगासनांची प्रात्यक्षिके केली व शेवटी ओंकार घेण्यात आला. सर्व शिक्षकही यात सहभागी झाले होते.



**कालिदास दिन –** शाळेत दि. २७ जून २०२३ रोजी महाकवी 'कालिदास दिन' साजरा करण्यात आला. कालिदासांच्या साहित्याबद्दल विद्यार्थ्यांना माहिती दिली. मा. पर्यवेक्षिका सौ. बोऱ्हाडे यांनी कालीदासाविषयीच्या प्रसिद्ध दंतकथा सांगितल्या. ९ वी विद्यार्थ्यांसाठी कार्यक्रम आयोजित केला होता.

**गुरुपौर्णिमा –** शाळेमध्ये गुरुपौर्णिमा सकाळ व दुपार विभागात साजरी झाली. सकाळी इ. १० वी च्या विद्यार्थ्यांना श्री. सुहास जावडेकर व दुपारी इ. ७ वी ९ वी च्या विद्यार्थ्यांना माजी मुख्याध्यापक श्री. पांचाळ यांनी गुरुपौर्णिमेच्या शुभेच्छा व मार्गदर्शन केले. कार्यक्रमास सर्व विद्यार्थी व शिक्षकवृंद उपस्थित होते.



**५ वी चे स्वागत –** डॉ बेडेकर विद्या मंदिर प्राथमिक विभागातून माध्यमिक विभागत प्रवेश झालेल्या इ. ५ वी च्या सर्व विद्यार्थ्यांचे दि. ५/७/२०२३ रोजी स्वागत केले. मा. मुख्याध्यापकांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. सर्वाना चॉकलेट वाटून प्रवेशोत्सव संपन्न झाला.




**N.C.C. Naval Camp –** महाराष्ट्र नेवल एन.सी.सी. युनिट मुंबई 'ब' तर्फे वार्षिक प्रशिक्षण शिबीर DAV Public स्कूल पनवेल येथे दि. २२ मे ते ३१ मे २०२३ या कालावधीत कॅम्प भरवण्यात आला होता. आपल्या शाळेचे १९ कॅडेटस्‌चा सहभाग होता. एकता व अनुशासन या बरोबरच विद्यार्थ्यांमधील विविध कलागुण दर्शन करण्याची संधी देण्यात आली. शाळेला सांस्कृतिक कार्यक्रमात द्वितीय पारितोषिक प्राप्त झाले. कॅम्प यशस्वीरित्या पूर्ण करून प्रमाणपत्र प्राप्त केले. शाळेचे शिक्षक CTO श्री संजय दिघे यांनी कॅडेटसना मार्गदर्शन केले.





**हिंदू भगिनी मंडळ, नौपाडा –** या मंडळातर्फे शाळेतील गरीब होतकरू ५ विद्यार्थीनींना शालेय गणवेश मोफत दिला जातो. यावर्षी खालील विद्यार्थिनींना तो देण्यात आला.

१. संस्कृती शंकर गावडे – ८ क
२. निधी निलेश ठाकूर – ८ क
३. किमया सुनीला दौडे – ८ ब
४. प्रांजल प्रदीप कदम – ७ क
५. सिद्धी सिताराम भोसले – ७ ब



**हरियाली संस्था व ठाणे महानगर पालिका तर्फे वृक्षारोपण –** कासारवडवली टीएमसी वृक्ष प्राधिकरण यांच्यामार्फत व हरियाली तर्फे वृक्षारोपण व बीज रोपण कार्यक्रम रविवार सकाळी पार पडला इयत्ता आठवीतील स्काऊट गाईड्स विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.




सत्याला शपथांच्या टेकूची गरज नसते !

## सौ. आनंदीबाई जोशी इंग्रजी पूर्व प्राथमिक विभाग

**शैक्षणिक वर्ष २०२३ – २०२४ ची सुरवात १५ जूनपासून झाली. जून व जुलै महिन्यातील उपक्रमांचा हा आढावा.**

**१५ जून २०२३ – परिचयात्मक सभा**

शाळेत नव्याने प्रवेश घेतलेल्या नर्सरी, ज्यूनियर व सिनीयरच्या पालकांसाठी गार्गी सभागृहात या परिचयात्मक सभेचे आयोजन १५ जून रोजी सकाळी ९.३० वाजता करण्यात आले होते. विद्या प्रसारक मंडळ व त्यांच्यातर्फे चालवण्यात येणाऱ्या सर्व संस्था यांचा थोडक्यात परिचय करून देण्यात आला. सौ.ए.के. जोशी शाळेच्या प्रगतीचा आलेख व पूर्वप्राथमिक विभागातील उपक्रमांची सचित्र माहिती विभाग प्रमुख सौ. अपर्णा वरुडकर यांनी करून दिली. यानंतर कोकम सरबताचा आस्वाद घेऊन पालकांनी पूर्वप्राथमिक विभागाचे वर्ग व शिक्षक यांना भेट दिली.

**१६ जून २०२३ – शाळेचा पहिला दिवस**

पूर्व प्राथमिक विभागाचा हा पहिला दिवस नर्सरी व ज्यूनियरच्या मुलांना शाळेत रुळण्यासाठी काही वेळ जावा लागला. पण हळूहळू ते सर्व शाळेत रमले. १९ जून पासून शाळा पूर्णवेळ सुरू झाली.

**विशिष्ट रंग दिवस**

मुलांना भाषा विषयाच्या अंतर्गत विविध रंगांची ओळख करून दिली जाते. मग परिसरातील त्या रंगांच्या वस्तू शोधा व सांगा, त्या रंगाची वस्तू घरून आणा असा गृहपाठ दिला जातो. याचाच एक भाग म्हणून ठरावीक दिवशी त्या रंगांचे कपडेही मुले परिधान करतात.

याच अंतर्गत - २३ जून - लाल, १२ जुलै - पिवळा व २८ जुलै - निळा या रंगांचे कपडे मुलांनी घातले.

**२८ जून – आषाढी एकादशी**

शालेय अभ्यासक्रमासोबत हिंदू संस्कृतीतील सर्व सण, विशेष दिवस शाळेत साजरे केले जातात.

२८ रोजी शाळेत आषाढी एकादशी साजरी करण्यात आली. या निमित्ताने मुलांनी पारंपरिक वेशभूषा केली होती. विठ्ठल रखुमाईच्या मुर्तिची मुलांनी पुजा केली. पालखी, तुळशी वृंदावन, झांजा अशा सर्वांसहित आमच्या छोट्या वारकरींची दिंडी निघाली. सिनीयरच्या मुलांना मैदानी खेळाचे महत्त्व कळावे म्हणून खेळाचे साहित्य घेऊन ही दिंडी काढली गेली. मीरा पाष्टे, आरव गानू, गार्गी कारेकर या मुलांनी विविध मैदानी खेळांची माहिती सर्वांना दिली. साखर फुटाण्याचा प्रसाद सर्वांना देण्यात आला.

**१ जुलै – पहिली पालक सभा**

पूर्वप्राथमिक विभागाची पहिली पालक सभा शनिवार दि. १ जुलै रोजी घेण्यात आली.

नर्सरी व ज्यूनियर सकाळी १०:३० ते ११:००

सिनीयर सकाळी ११:३० ते १२:००

शाळेतील विविध उपक्रम, मुलांचा दिनक्रम, त्यांचा सहभाग, प्रगती या बद्दल पालकांना माहिती देण्यात आली. प्रत्येक गटातील एक याप्रमाणे पालक प्रतिनिधीची निवड या पालक सभेत करण्यात आली.

**३ जुलै – गुरूपौर्णिमा**

आषाढ महिन्यातील पौर्णिमा गुरूपौर्णिमा म्हणून साजरी करण्यात येते. आई, वडील हे प्रथम गुरू. यानंतर शिक्षक मुलांचे गुरू असतात. आई-वडिलांचा मान राखणे, त्यांना नमस्कार करणे याचे महत्त्व मुलांना शिक्षकांनी सांगितले.

**बनी टमटोला**

स्काऊट गाईडच्या अंतर्गत पूर्वप्राथमिक विभागात घेतल्या जाणाऱ्या उपक्रमांना 'बनी टमटोला' असे

संबोधले जातात. दर बुधवारी 'बनीचे' (सशाचे) चित्र असलेला ॲप्रन मुले घालून येतात. सणांचे महत्त्व, दिनविशेष, चांगल्या सवयी याविषयी माहिती; तर बागकाम, वर्गाची स्वच्छता स्वावलंबनाचे पाठ अशा अनेक गोष्टी वर्षभर या उपक्रमाअंतर्गत घेतले जातात.

## सौ. आनंदीबाई जोशी इंग्रजी प्राथमिक विभाग

**Spell Bee परीक्षेचा निकाल**

**स्तर-चौथा (आंतरराष्ट्रीय स्तर)**

आंतरराष्ट्रीय स्तरावर झालेल्या Spell Bee परीक्षेत भरघोस यश मिळविणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांचे हार्दिक अभिनंदन!

शाळेतील १५ विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट श्रेणीत यश मिळविले आहे.

| | विद्यार्थ्यांची नावे | प्राप्त गुण | इयत्ता |
|---|---|---|---|
| १ | कु. हर्ष रविकांत रसाळ | ९७ | १ली |
| २ | कु. मेहेक मंदार शितुल | ९६ | १ली |
| ३ | कु. अन्वी अजय गोखले | ९६ | १ली |
| ४ | कु. सोहम सुजित सावडे | ९६ | १ली |
| ५ | कु. नीरजा स्वप्नील निर्गुण | ९१ | १ली |
| ६ | कु. शनाया सचिन देशपांडे | ८९ | १ली |
| ७ | कु. अवनीश तुषार चव्हाण | ९७ | २री |
| ८ | कु. स्वानंद स्वप्नील बेलोसे | ९६ | ३री |
| ९ | कु. ओजस अद्वैत मोडक | ९०.५ | ३री |
| १० | कु. युक्ता धीरज झगडे | ९० | ३री |
| ११ | कु. रेवा सचिन पिंपळे | ८८.५ | ३री |
| १२ | कु. अद्वैत आकाश वझे | ८७ | ३री |
| १३ | कु. शारव अमेय आपटे | ८८.७५ | ४थी |
| १४ | कु. श्लोक राहुल सरोदे | ८५ | ४थी |
| १५ | कु. अर्णव नीतिन दांडेकर | ७६.२५ | ४थी |

**चित्रकला स्पर्धा**

विद्यार्थ्यांमध्ये अनेक कलागुण दडलेले असतात. अभ्यासाबरोबरच त्यांच्या अंगी असणाऱ्या विविध कला-गुणांना वाव मिळण्यासाठी स्पर्धा नेहमीच उपयुक्त ठरतात.

दरवर्षीप्रमाणे ह्या वर्षीही शाळेत स्व. रोशन जाल पटेल मॅडम यांच्या स्मरणार्थ २६ जून २०२३ रोजी चित्रकला स्पर्धा आयोजित करण्यात आली.

१ ली ते ४थी च्या विद्यार्थ्यांनी ह्या स्पर्धेत अतिशय उत्साहाने सहभागी होऊन चित्रकलेचा आनंद लुटला. आपल्या आवडीचे चित्र काढण्यात इ. १ली चे विद्यार्थी, तर दिलेल्या विषयावर चित्र काढण्यात इ. २ री ते ४थी चे विद्यार्थी रममाण झालेले होते. अभूतपूर्व प्रतिसाद मुलांनी या स्पर्धेस दिला.

**आषाढी एकादशी**

संपूर्ण महाराष्ट्र विठ्ठलमय झालेला असताना शाळेतही असेच भक्तिमय वातावरण निर्माण झाले होते. विविध रंगांच्या पारंपरिक वेशभूषेत आलेल्या मुलांनी संपूर्ण शाळा उत्साहात नाहून निघाली होती. दिंड्या, पताका, तुळशी वृंदावन, टाळ, चिपळ्यांचा नाद आणि विठ्ठलाचा गजर याने शाळा दुमदुमली होती.

आषाढी एकादशीला निघणाऱ्या वाऱ्या कोठे जातात, आषाढी एकादशीचे महत्त्व, एकादशीची गोष्ट इ. विषयी काही विद्यार्थ्यांनी माहिती सांगितली. एका विद्यार्थिनीने 'कानडा राजा पंढरीचा' हे गीत अतिशय सुरेल आवाजात सादर केले.

इ.४थी च्या आमच्या चिमुकल्या वारकऱ्यांनी मनाला भावणाऱ्या वारीचे दर्शन घडविले. पालखी घेऊन विठ्ठलाचे नामस्मरण करत ही वारी संपूर्ण शाळेत फिरली. सर्व विद्यार्थी व शिक्षक यांच्या चेहऱ्यावर पंढरपूरच्या विठ्ठलाचे दर्शन घेतल्याचे समाधान, आनंद झळाळत होता.

ध्येयवादाला स्वत:च्या हृदयातील उतावळेपणाचे भय असते,
म्हणूनच कोणत्याही कामात उतावळेपणा करू नका; संयम पाळा.

या वारीच्या दरम्यान 'विद्यार्थ्यांनी मोबाईलचा अति वापर करू नये' या विषयावर सुंदर भारूड सादर करून खूप छान प्रबोधन केले.

**आंतरराष्ट्रीय योग दिन**

सुदृढ शरीरात आनंदी मन राहत असते. शरीर स्वास्थ्य राहाण्यासाठी व्यायाम महत्त्वाचा असतो आणि भारताने संपूर्ण जगाला दिलेली देणगी म्हणजेच 'योग' सारखा दुसरा सर्वांग सुंदर व्यायाम कोणता असणार?

२१ जून २०२३ रोजी 'योग दिना'चे औचित्य साधून वैविध्यपूर्ण कार्यक्रमांचे सादरीकरण करण्यात आले. यादिवशी 'योग दिन' म्हणजे काय? योग आपल्या शरीरासाठी कसा फायद्याचा आहे इ. माहिती दिली. एका विद्यार्थिनीने योग विषयी माहिती सांगत असताना श्वसनाचा एक व्यायाम प्रकार योग्य त्या सूचना देऊन सर्व विद्यार्थ्यांकडून व शिक्षकांकडून करून घेतला.

शारीरिक शिक्षणाच्या तासिकेमध्ये शिक्षिकेने सर्व वर्गांचे काही आसनप्रकार करून घेतले. अनुलोम-विलोम, वज्रासन, पद्मासन, गोमुखासन, ताडासन, त्रिकोणासन, वृक्षासन असे प्राणायाम व संचलन घेतले गेले.

योग आपल्या शारीरिक, मानसिक विकासासाठी कसे फायदेशीर आहेत हे सांगण्यात आले. योगामुळे शरीराची लवचिकता वाढते, मानसिक ताण कमी होतो, शरीराचा समतोल व समन्वय साधता येतो इ. माहिती मुलांना देण्यात आली.

## सौ. आनंदीबाई जोशी माध्यमिक विभाग

**मार्च २०२२ च्या माध्यमिक शालांत परीक्षेचा निकाल:**

| | |
|---|---|
| एकूण विद्यार्थी | १३२ |
| परीक्षेला बसलेले विद्यार्थी | १३२ |
| उत्तीर्ण विद्यार्थी | १३१ |
| टक्के वारी | ९९.२४% |
| विशेष प्रावीण्य | १०८ |
| प्रथम श्रेणी | २० |
| द्वितीय श्रेणी | ०३ |

| टक्के | विद्यार्थी संख्या |
|---|---|
| ९० आणि अधिक | ५३ |
| ७५ - ९० | ५५ |
| ६० - ७४ | २० |
| ४५ - ५९ | ३ |

**पहिले दहा क्रमांक :**

**कु. गौतमी सहस्रबुद्धे (सांस्कृतिक सवलत गुणांसहित) - १००%**

**कु. यश स्वार : ९८%**

| अनु. क्र. | विद्यार्थ्यांचे नाव | % |
|---|---|---|
| १ | गौतमी सहस्रबुद्धे | १००% |
| २ | अमृता बापट | ९८.४०% |
| ३ | रिद्धिमा तारी | ९८.२०% |
| ४ | जय जोशी | ९८.००% |
| ५ | यश स्वार | ९८.००% |
| ६ | तनया शिंदे | ९७.८०% |
| ७ | विराज गोगटे | ९७.२०% |
| ८ | ओजस कालवणकर | ९७.००% |
| ९ | अमेय जवेरी | ९६.८०% |
| १० | यशश्री दाभोळकर | ९६.८०% |
| ११ | शर्वरी मोहिते | ९६.६०% |
| १२ | गायत्री बेडेकर | ९६.४०% |
| १३ | उमा करंदीकर | ९६.४०% |

ज्ञानाशिवाय भक्ती आंधळी आहे, भक्तीशिवाय कर्म आंधळे आहे आणि
ज्ञान, भक्ती व कर्म याशिवाय जीवन आंधळे आहे...

**विषयातील सर्वप्रथम क्रमांक**

| विषय | विद्यार्थ्यांची नावे | गुण |
|---|---|---|
| इंग्रजी | उमा करंदीकर | ९४ |
| मराठी | गौतमी सहस्रबुद्धे | ९७ |
| | तनया शिंदे | ९७ |
| संस्कृत | विराज गोगटे | १०० |
| | अमृता बापट | १०० |
| | धन्वी देशमुख | १०० |
| | रुचिर दामले | १०० |
| हिन्दी | स्वागता सावंत | ८९ |
| गणित | गौतमी सहस्रबुद्धे | ९९ |
| विज्ञान | यश स्वार | ९९ |
| समाज शास्त्र | यश स्वार | ९८ |
| | रिद्धिमा तारी | ९८ |
| | ओजस कालवणकर | ९८ |
| | अमृता बापट | ९८ |
| | अश्मित सुर्वे | ९८ |
| | हेत्वी ठक्कर | ९८ |
| | वरद वालावलकर | ९८ |
| | उमा करंदीकर | ९८ |

**Spell Bee International आयोजित स्पर्धेचा निकाल २०२२ – २३ :**

पदक प्राप्त विद्यार्थ्यांची नावे :

१) मिहीर कोरडे – ७८%
२) गार्गी आढव – ७५%
३) मैत्रेयी गांगल – ८३.७५%
४) गार्गी गोखले – ८२%
५) साईशा घाग – ६७.२५%

## विद्या प्रसारक मंडळाचे
## ठाणे नगरपालिका विधी महाविद्यालय

**सेमिस्टर – III परीक्षा : १ जून २०२३**

विद्यापीठ सेमिस्टर – III परीक्षा विद्यापीठाच्या वेळापत्रकानुसार १, ५, ७ आणि ९ जून रोजी १.३० ते ४.३० दरम्यान घेण्यात आल्या. या विषयांची अंतर्गत परीक्षा ४.३० ते ६.०० दरम्यान घेण्यात आल्या.

| दिवस आणि तारीख | वेळ | विषय |
|---|---|---|
| गुरुवार १ जून २०२३ | दु.२.३० ते सं ४.३० | प्रशासकीय कायदा |
| सोमवार ५ जून २०२३ | दु.२.३० ते सं ४.३० | कौटुंबिक कायदा-II |
| बुधवार ७ जून २०२३ | दु.२.३० ते सं ४.३० | मालमत्ता कायदा आणि सुलभता कायदा हस्तांतरण |
| शुक्रवार ९ जून २०२३ | दु.२.३० ते सं ४.३० | कंपनी कायदा |

विद्यापीठाच्या वेळापत्रकानुसार १२, १४, १६ आणि २० जून रोजी स. १०.३० ते दु. १२.३० दरम्यान विद्यापीठ सेमिस्टर – IV परीक्षा घेण्यात आल्या. १२.३० ते २.०० या वेळेत या विषयासाठी अंतर्गत परीक्षा घेण्यात आल्या.

| दिवस आणि तारीख | वेळ | विषय |
|---|---|---|
| सोमवार १२ जून २०२३ | स.१०.३० ते दु.१२.३० | न्यायशास्त्र |
| बुधवार १४ जून २०२३ | स.१०.३० ते दु.१२.३० | करार कायदा – दोन |
| शुक्रवार १६ जून २०२३ | स.१०.३० ते दु.१२.३० | जमीन कायदा |

आपले अंत:करण जोपर्यंत शुद्ध आहे, तोपर्यंत कशाचीही भीती बाळगण्याची जरुरी नाही.

| | | |
|---|---|---|
| मंगळवार २० जून २०२३ | स.१०.३० ते दु.१२.३० | क्रिमिनोलॉजी, कर आकारणी कायदा, दिवाळखोरी कायदा |

**१,८,१२ जून खालील अंतर्गत घटक परीक्षा घेण्यात आल्या.**

डी.पी.सी – I – सेमिस्टर II – १/६/२०२३
डी.पी.सी – I (अतिरिक्त) – ८/६/२०२३
डी.पी.सी – प्रकल्प सादर करणे –१२/६/२०२३

**विशेष व्याख्यान ॲड. कोमल सिन्हा. 'घरगुती हिंसाचार' कायद्यावर कार्यशाळा : २ आणि ३ जून २०२३**

ॲड. श्री कोमल गोपाल सिन्हा, ज्या उच्च न्यायालयामध्ये कायदेशीर मदत पॅनलसाठी वकील आहेत.

प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांसाठी घरगुती हिंसाचार कायद्यावर कार्यशाळेचे विशेष आयोजन करण्यात आले होते. माजी विद्यार्थ्यांसह द्वितीय आणि तृतीय वर्षाचे विद्यार्थी सहभागी होण्यासाठी आले होते आणि ॲड. कोमल सिन्हा यांनी वास्तविक जीवनातील उदाहरणांसह घरगुती हिंसाचार कायद्याबद्दल थोडक्यात माहिती दिली.




**MPSC परीक्षा : ४ जून २०२३**

रविवारी, ४ जून २०२३ रोजी महाराष्ट्र लोकसेवा आयोगा तर्फे आयोजित केलेल्या MPSC परीक्षेसाठी विद्या प्रसारक मंडळाचे ठाणे नगरपालिका विधी लॉ कॉलेज परीक्षा केंद्र होते.

**जागतिक पर्यावरण दिन : ५ जून २०२३**

आपल्या विद्यार्थ्यांना, 'आपल्या पृथ्वी ग्रहाचे महत्त्व आणि निसर्गाला शब्दबद्ध करण्याची आपली जबाबदारी' याविषयी प्रतिज्ञा करण्याचा हा प्रसंग होता. पृथ्वी मातेचे रक्षण करण्याची आणि प्लास्टिकचा वापर निम्म्यापर्यंत कमी करण्याची संपूर्ण जबाबदारी सर्व विद्यार्थी आणि शिक्षकांनी घेतली होती; आणि 'प्लास्टिकच्या बाहेरील पर्यावरणपूरक उत्पादने वापरा' असे विद्यार्थांना संबोधित केले गेले.



**शिवराज्याभिषेक दिन : ६ जून २०२३**

महाविद्यालयाच्या ग्रंथालयात शिवराज्याभिषेक दिन साजरा करण्यात आला. प्रो कृष्णा कामथ यांनी सर्वांना या दिवसाचे महत्त्व सांगून थोडक्यात परिचय करून दिला. सर्व कर्मचारी आणि विद्यार्थ्यांनी 'छत्रपती शिवाजी महाराज' यांना नमन करून आदरांजली वाहिली. एलएलबी तृतीय वर्षाची विद्यार्थिनी 'क्षितिजा खांडके' हिने अभिमानास्पद 'शिवगर्जना' दिली आणि 'छत्रपती शिवाजी महाराज' यांच्या गौरवशाली जीवनाबद्दलही सांगितले.



**अटेंडंस समिती : १२ जून २०२३**

१२ जून पासून सेमिस्टर ४ च्या परीक्षा सुरू झाल्या आहेत. अटेंडंस समितीने विद्यार्थ्यांच्या अनुपस्थितीचा आढावा घेतला, अनुपस्थित विद्यार्थांना सूचित केले आणि त्यांना १ जून ते २० जून या कालावधीत त्यांना अनुपस्थितीची भरपाई करण्यासाठी सहकार्य करणे आवश्यक आहे.

**NAAC**

कॉलेज द्वितीय सायकल NAAC मान्यता घेत आहे. एस.एस.आर १७ मे २०२३ रोजी ४५ दिवसांच्या कालावधीत सबमिट करण्यात आले होते. डेटा प्रमाणीकरण आणि पडताळणी ११ जून २०२३ रोजी सुरू झाली. डेटा प्रमाणीकरण आणि पडताळणी स्पष्टीकरणे २४ जून २०२३ रोजी दिलेल्या १५ दिवसांच्या आत सादर करण्यात आले आहेत. आम्ही समवयस्क संघच्या भेटीसाठी तारखांची वाट पाहात आहोत.

**विधी फाऊंडेशन दिवस : १७ जून २०२३**

महाविद्यालयाने विधी बंध (माजी विद्यार्थी संघटना) यांच्या संयुक्त विद्यमाने 'नावनोंदणी, ऑल इंडिया बार असोसिएशन परीक्षांची तयारी आणि व्यावसायिक नैतिकता' यावर एक दिवसीय कार्यशाळा आयोजित केली होती ५१ व्या स्थापना दिनानिमित्त महाविद्यालयाने दिनांक १७ जुन २०२३ रोजी एक दिवसीय कार्यशाळेचे आयोजन केले होते. वकीलांची व्यावसायिक नैतिकता आणि ऑल इंडिया बार असोसिएशन परीक्षांची तयारी कशी करावी हा या कार्यशाळेचा विषय होता. ठाणे जिल्हा न्यायालयाचे न्यायाधिश व जिल्हा विधी सेवा प्रधिकरणाचे सचिव श्री. ईश्वर सूर्यवंशी व महाराष्ट्र व गोवा अधिवक्ता मंडळाचे सदस्य व वरिष्ठ अधिवक्ता ॲड. गजानन चव्हाण यांच्या हस्ते या कार्यशाळेचे उद्घाटन झाले. यावेळी प्रभारी प्राचार्या डॉ. श्रीविद्या जयाकुमार व विधी सहाय्य केंद्राचे प्रभारी प्रा. विनोद एच वाघ हजर होते. श्री. ईश्वर सूर्यवंशी यांनी आपल्या वैयक्तिक अनुभवाच्या मदतीने जे.एन.एफ.सी परीक्षेच्या तयारीसाठी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. ॲड. गजानन चव्हाण यांनी माननीय कोर्टात वकील म्हणून पाळल्या जाणाऱ्या व्यावसायिक नैतिकतेबद्दल विद्यार्थ्यांना प्रबोधन केले. यावेळी ॲड. संजय म्हात्रे यांनी विद्यार्थ्यांना ऑल इंडिया बार असोसिएशन परीक्षेच्या तयारीबाबत मार्गदर्शन केले. फॉर्म भरण्याची योग्य पद्धतही त्यांनी दाखवून दिली. आमचे माजी विद्यार्थी श्री रविकुमार राव यांनी तपशीलवार सादरीकरण केले आणि अभ्यासक्रम, योग्य दृष्टिकोन कृती ऑल इंडिया बार असोसिएशन परीक्षा आणि ते स्पष्ट करण्यासाठी टिपा आणि आर्टिकल स्पष्ट केले. आमच्या २०२२ बॅच च्या माजी विद्यार्थ्यांकडून कॉलेज ला 'साउंड सिस्टम, व्हॅक्यूम क्लिनर आणि एक एलसीडी प्रोजेक्टर' भेट वस्तू देण्यात आल्या.

विद्यार्थ्यांकडून भेटवस्तू स्वीकारताना उपस्थित मान्यवर एल.डी. दिवाणी न्यायाधीश श्री ईश्वर सूर्यवंशी, एस.आर. अधिवक्ता ॲड. गजानन चव्हाण, प्राचार्य डॉ. श्रीविद्या जयकुमार आणि प्रा. विनोद एच. वाघ हजर होते.



**'विधी फाऊंडेशन' आणि 'विधी बंध स्टडी सर्कल' : २४ जून २०२३**

रविवार, २४ जून रोजी 'विधी फाऊंडेशन' आणि 'विधी बंध' यांनी स्टडी सर्कलचे मूट कोर्ट हॉलमध्ये आयोजन केले होते. ॲड श्री. प्रसाद कुलकर्णी यांनी ''कायदा क्षेत्रातील संधी'' या विषयावर भाषण केले. व्ही पी एम विधी महाविद्यालयातील कायद्याचे विद्यार्थी व एम.सी.टी, ए.व्ही.जी, जय भगवान या महाविद्यालयातील कायद्याच्या विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून कारकीर्दमधील मार्गदर्शनाचा लाभ घेतला.




**न्यायिक कायदा लिपिक**



विद्या प्रसारक मंडळाचे ठाणे नगरपालिका विधी एल.एल.बी महाविद्यालयातून २०२१-२२ मध्ये ग्रॅज्युएट झालेल्या साधना सावंत यांची नुकतीच मुंबई येथील उच्च न्यायालयामध्ये कायदा लिपिक म्हणून निवड झाली आहे हे सांगताना आम्हाला अभिमान वाटतो. साधना सावंत यांचे हार्दिक अभिनंदन.

**महाराष्ट्र न्यायिक अकॅडमी भेट : २७ जून २०२३**

प्राचार्य डॉ. श्रीविद्या जयकुमार आणि व्हिजिटिंग फॅकल्टी ॲड. कोमल गोपाल सिन्हा यांनी माननीय न्यायमूर्ती संदीप शिंदे यांच्या विशेष निमंत्रणावरून २७ जून २०२३ रोजी महाराष्ट्र न्यायिक अकॅडमीला भेट दिली. विधी महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांसाठी एका अभ्यासक्रमाची व्यवस्था करण्यासाठी ही भेट होती. दोघेही अकॅडमीच्या आवारात फेरफटका मारत असताना अकॅडमी मधील वर्ग, कॅन्टीन, लायब्ररी आणि स्टोअर रूम हे बघता आले.

**आपत्ती व्यवस्थापन कायद्यातील प्रमाणपत्र कार्यक्रम: ३० जून २०२३**

३० जून रोजी सायंकाळी ५.१५ ते ८.०० या वेळेत परीक्षा ऑनलाईन (पावसाळ्याच्या प्रतिकूल परिस्थितीमुळे) घेण्यात आल्या. विद्यार्थी ऑनलाईन सहभागी झाले तसेच ई-मेल द्वारे प्रोजेक्ट सादर करण्यात आले.

**बार कौन्सिल ऑफ इंडिया मान्यता प्राप्त :**

बी.सी.आय.ची मान्यता २४ जून रोजी मेलद्वारे कॉलेजला २०२२-२०२३ पर्यंत मान्यता मिळाली जी २०२१ पासून प्रलंबित होते. बार कौन्सिल ऑफ इंडिया ला प्राचार्य आणि ग्रंथपालांकडून आवश्यक अनुपालन प्रतिज्ञापत्र मेल आणि नोंदणीकृत-पोस्टद्वारे पाठवले गेले.

**पुनर्मूल्यांकन निकाल; सेमिस्टर - I**

२७, २८ आणि ३० जून २०२३ रोजी सेमिस्टर-I चे पुनर्मूल्यांकन निकाल जाहीर करण्यात आले.

## विद्या प्रसारक मंडळाचे तंत्रनिकेतन

हिवाळी २०२२, उन्हाळी २०२३ (निकालाप्रमाणे प्रथम २ विद्यार्थी)

**कॉम्प्युटर इंजिनीअरिंग विभाग :-**

| वर्ष | स्थान | विद्यार्थी | गुण | पैकी | (%) |
|---|---|---|---|---|---|
| प्रथम | १ | शेख स्वलेखा मसूद | १३४६ | १५०० | ८९.७३ |
| | २ | विस्पुते आर्य दत्तात्रेय | १३४१ | १५०० | ८९.४० |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| द्वितीय | १ | मनिष भास्कर राजे | १३६३ | १५०० | ९०.८७ |
| | २ | सूर्यवंशी आर्या कल्पक | १३५१ | १५०० | ९०.०७ |
| तृतीय | १ | बोरकर वैष्णवी शिरीश | १५९८ | १७५० | ९१.३१ |
| | २ | सावंत अतिफ मन्सूर | १५८८ | १७५० | ९०.७४ |
| | ३ | मुस्तासिर हबिल भगत | १५८८ | १७५० | ९०.७४ |

**इलेक्ट्रीकल पॉवर सिस्टीम विभाग :-**

| वर्ष | स्थान | विद्यार्थी | गुण | पैकी | (%) |
|---|---|---|---|---|---|
| प्रथम | १ | जंगम विवेक मंगेश | १२८१ | १५०० | ८५.४२ |
| | २ | साने मिहीर हेमंत | १२२५ | १५०० | ८१.७५ |
| द्वितीय | १ | थोरात कस्तुरी रमेश | १३४० | १५५० | ८६.४५ |
| | २ | कदम वेदिका प्रमोद | १३२१ | १५५० | ८५.४५ |
| तृतीय | १ | सारक शुभम कृष्णदेव | १५४८ | १८०० | ८६.०० |
| | २ | जाधव आदित्य गणेश | १५०९ | १८०० | ८३.८३ |

**इंडस्ट्रीयल इलेक्ट्रॉनिक्स विभाग -**

| वर्ष | स्थान | विद्यार्थी | गुण | पैकी | (%) |
|---|---|---|---|---|---|
| प्रथम | १ | रोडे मंजिरी सुशांत | ११२६ | १५०० | ७५.०७ |
| | २ | पडवळ वेदांत | १०९२ | १५०० | ७२.८० |
| द्वितीय | १ | झा मेहर बबलू | १३०३ | १५५० | ८४.०६ |
| | २ | जावरे रोहन राम | १२९९ | १५५० | ८३.८१ |
| तृतीय | १ | तेजस विलास धुरी | १५०३ | १७५० | ८५.८९ |
| | २ | वाल्मीकी प्रवीण मल्लीकर | १४७७ | १७५० | ८४.४० |

**इन्फोरमेशन टेक्नॉलॉजी विभाग -**

| वर्ष | स्थान | विद्यार्थी | गुण | पैकी | (%) |
|---|---|---|---|---|---|
| प्रथम | १ | शेलार तन्मय नामदेव | १३६६ | १५०० | ९१.०७ |
| | २ | पाटील गितेश प्रवीण | १३१० | १५०० | ८७.३३ |
| द्वितीय | १ | कदम रुपाली दशरथ | १४४८ | १६०० | ९०.५० |
| | २ | ताकळकर श्री जालिंदर | १४४५ | १६०० | ९०.३१ |
| तृतीय | १ | जिंदानी नायब असिफ | १४६२ | १६०० | ९१.३८ |
| | २ | नाकटे आयुष राजन | १४३६ | १६०० | ८९.७५ |

**इन्स्ट्र्युमेन्टेशन इंजिनीअरिंग**

| वर्ष | स्थान | विद्यार्थी | गुण | पैकी | (%) |
|---|---|---|---|---|---|
| प्रथम | १ | परब श्रेयस गजानन | ११९६ | १५०० | ७९.७३ |
| | २ | मिश्रा दिशा रत्नेश | ११५८ | १५०० | ७७.२० |
| द्वितीय | १ | शिर्के रितेश मारुती | १४०३ | १५५० | ९०.५२ |
| | २ | शहाणे दीप योगेश | १३११ | १५५० | ८४.५८ |
| तृतीय | १ | नेहा महादेव घोलप | १६१८ | १८०० | ८९.८९ |
| | २ | जोशी कुणाल प्रकाश | १३०९ | १८०० | ८९.३९ |

## डॉ. वा. ना. बेडेकर व्यवस्थापन अभ्यास संस्था, ठाणे

**जून २०२३ मधील कार्यक्रम / वार्ता**

**डॉ. व्ही एन ब्रिम्स ने एन .बी.ए. (NBA) मान्यता मिळवली!!!**

''ब्रिम्सच्या'' या एम एम एस अभ्यासक्रमाला एन बी ए (NBA - National Board of Accreditation - New Delhi) तर्फे मान्यता मिळाली आहे. शैक्षणिक वर्ष २०२३-२४ पासून तीन वर्षांसाठी ही मान्यता देण्यात आली आहे. (डॉ. व्ही एन ब्रिम्सला २०१९ मध्ये एन ए ए सी (NAAC - National Assessment and Accreditation Council) ची मान्यता देखील मिळाली आहे.

एप्रिल २०२३ मध्ये एन.बी.ए. तज्ज्ञ समितीने ब्रिम्सला तीन दिवसीय परीक्षण कार्यक्रमाच्या निमित्ताने भेट दिली. या भेटीमध्ये संस्थेचे संचालक आणि विभाग प्रमुख यांचे सादरीकरण, संस्था आणि आवाराचा दौरा, प्रशासकीय मंडळाचे सदस्य, विद्यार्थी, माजी विद्यार्थी,

पालक, नियुक्ती करणारे, इतर भागधारक, प्राध्यापक आणि कर्मचारी यांच्या भेटी, चर्चा, आणि अभ्यास, अंदाजपत्रक, खाती, इ. विविध दस्तऐवजांचा आढावा अशा विविध उपक्रमांचा समावेश होता.

डॉ. व्ही एन ब्रिम्सने नेहमीच आपल्या विद्यार्थ्यांना दर्जेदार, मूल्य-केंद्रित व्यवस्थापन शिक्षण देण्याचा प्रयत्न केला आहे. आता एन बी ए द्वारे देखील ब्रिम्सच्या एम एम एस कार्यक्रमाला प्रमाणित केले गेले आहे. या मान्यतेसह विद्या प्रसारक मंडळाचे अध्यक्ष डॉ. विजय व्ही. बेडेकर, ब्रिम्सचे महासंचालक व तज्ज्ञ मार्गदर्शक डॉ. गुरुप्रसाद मूर्ती व ब्रिम्सचे संचालक डॉ. नीतिन जोशी, यांनी व्यवस्थापन शिक्षण क्षेत्रात गुणवत्ता निरंतर वाढविण्याचा व विद्यार्थ्यांना प्रदान करण्याचा, आपला प्रवास सुरूच ठेवण्याचा निर्धार केला आहे.

१ जून : श्री. संदीप मोघे यांनी 'चॅट जीपीटी अँड एआय विथ एम एस ऑफिस' या विषयावरील ३ तासांची थेट (ऑनलाईन) कार्यशाळा यशस्वीरीत्या पूर्ण केली.




३ जून : डॉ. नीतिन जोशी; सीआयआय (CII) तर्फे आयोजित मूल्यांकनकर्त्यांसाठीच्या रिफ्रेशर्स कोर्सला उपस्थित राहिले.


५ जून : डॉ. नीतिन जोशी यांना विवेकानंद सोसायटीच्या इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट (PGDM) येथे तज्ज्ञ म्हणून मुलाखती घेण्यासाठी आमंत्रित करण्यात आले.


५ जून : प्रा. सिद्धेश सोमण यांनी एमएमएस अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी इच्छुक विद्यार्थ्यांसाठी 'करिअर प्रॉस्पेक्ट्स फॉर एमएमएस / एमबीए फायनान्स' या विषयावर ऑनलाइन सत्र आयोजित केले.




६ जून : श्री संदीप मोघे मुंबई विद्यापीठ - कलिना, सांताक्रूझ येथे एबीसी आयडी - ॲकॅडमिक बँक ऑफ क्रेडिट्स संदर्भात बैठकीला उपस्थित राहिले.

७ जून : डॉ. स्मिता जपे; सीआयआय (CII) तर्फे आयोजित 'एक्झिम अवॉर्डच्या रिफ्रेशर कोर्स'ला उपस्थित राहिल्या.



८ जून : विद्यालंकार इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी, वडाळा तर्फे सहा.प्रा. विभूती सावे यांची 'प्रकल्प व्यवस्थापन' विषयासाठी बाह्य परीक्षक म्हणून नियुक्ती करण्यात आली.

१० जून : डॉ. पल्लवी चंदवासकर यांनी योग प्रशिक्षक म्हणून श्री अंबिका योग कुटीर, ठाणे येथील योग शिक्षकांसाठी आयोजित अतिथीसत्रामध्ये सूर्यनमस्कारा-संबंधी मार्गदर्शन केले.

१२ ते १७ जून : डॉ. कांचन यांनी व्यावसायिकांसाठी व्यक्तिमत्त्व विकासावर १ आठवड्याचा कार्यक्रम आयोजित केला. हा कार्यक्रम २५ सहभागींसह प्रत्यक्ष व दूरस्थ माध्यम (हायब्रीड) अशा दोन्ही पद्धतीने आयोजित करण्यात आला.


१९ जून : डॉ. नीतिन जोशी यांना 'बाबा साहेब इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट' येथे विषय तज्ज्ञ म्हणून आमंत्रित करण्यात आले.

२० जून : श्री. संदीप मोघे यांनी, 'क्रिसिल रेटिंग आय टी सेक्टर : कोडिंग फॉर ग्रोथ इन स्लोडाऊन' या वेबिनार मध्ये सक्रिय सहभाग घेतला.




२१ जून : डॉ. कांचन यांनी माइंडस्टिक लॅब्स प्रा. लि. साठी प्रशिक्षण कार्यक्रम सुरू केला. यामध्ये 'सॉफ्टवेअर डेव्हलपर्ससाठी सॉफ्ट स्किल्स आणि कम्युनिकेशन' या विषयावर प्रशिक्षण दिले जाते.

२१ जून : आयक्यूएसी समितीने सीएसआर समितीच्या सहकार्याने 'आंतरराष्ट्रीय योग दिन' साजरा केला. डॉ. पल्लवी चंदवासकर यांनी, प्राध्यापक आणि कर्मचारी सदस्यांना योग शिष्टाचारासंबंधी मार्गदर्शन केले. एमएमएस ची विद्यार्थिनी सोनाली पानपाटील हिने प्रात्यक्षिके सादर केली आणि विद्यार्थी अभिषेक एला यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले.



२६ जून : श्री. वैष्णव विद्यापीठ विश्व विद्यालय, इंदूर. तर्फे आयोजित प्रतिती २०२३ - 'एक्सपरिनेन्शिअल लर्निंग फ्रॉम सिम्युलेशन अँड गेम्स' या विषयसूत्रावर आधारित वेबिनार मालिकेत डॉ. स्मिता जपे सहभागी झाल्या.

२७ आणि २८ जून : ब्रिम्सच्या नियुक्ती विभाग सदस्य, स्वेता नायर, कोहिनूर बिझनेस स्कूल मुंबई येथे 'इंडस्ट्री ॲकॅडेमिया एक्सपेक्टेशन, गॅप इन कम्युनिकेशन' या विषयावर आधारित २ दिवसीय प्राध्यापक विकास कार्यक्रमाला उपस्थित राहिल्या.



## महर्षी परशुराम अभियांत्रिकी महाविद्यालय, वेळणेश्वर

विद्या प्रसारक मंडळ ठाणे संचलित वेळणेश्वर येथील महर्षी परशुराम अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा.



रत्नागिरी जिल्ह्यात उच्च शिक्षणाच्या सोयी–सुविधांची कमतरता लक्षात घेऊन विद्या प्रसारक मंडळ (ठाणे) यांनी २०१० साली वेळणेश्वर सारख्या ग्रामीण भागात महर्षी परशुराम अभियांत्रिकी महाविद्यालयाची पायाभरणी केली.

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना आंतरराष्ट्रीय दर्जाच्या सोयी–सुविधा आणि दर्जेदार शिक्षण देण्यासाठी २०१२ साली वेळणेश्वर येथे अभियांत्रिकी महाविद्यालय प्रत्यक्ष सुरू झाले.

सुरवातीपासूनच विद्यार्थ्यांच्या उज्वल भविष्यासाठी कटीबद्ध राहिल्यामुळे वेळणेश्वर येथील अभियांत्रिकी महाविद्यालयाला अल्पावधीतच 'नॅक' चे मानांकन प्राप्त झाले.

एवढ्या कमी कालावधीत 'नॅक' चे मानांकन मिळवणारे मुंबई विद्यापीठाअंतर्गत सर्वात तरुण महाविद्यालय म्हणजे महर्षी परशुराम अभियांत्रिकी महाविद्यालय, वेळणेश्वर हे होय.


विद्या प्रसारक मंडळाने कोविड महामारीमुळे उद्भवलेली भीषण परिस्थिती लक्षात घेऊन केंद्र सरकारच्या 'बेटी बचाओ बेटी पढाओ' या मोहिमेला प्रतिसाद म्हणून मुलींसाठी महाविद्यालयात 'कोकणकन्या शिष्यवृत्ती योजना' २०२० पासून सुरू केली आणि विद्या प्रसारक मंडळाची शिष्यवृत्ती सुरू केली या माध्यमातून १५० विद्यार्थ्यांना प्रथम आणि थेट द्वितीय वर्षाच्या विद्यार्थ्यांना एक वर्षाचे शैक्षणिक शुल्क माफ करण्यात आले.

विद्यार्थ्यांच्या प्रगतीसाठी विद्यापीठाने ठरवून दिलेल्या अभ्यासक्रमा व्यतिरिक्त उद्योगाभिमुख शिक्षण देण्यावर महाविद्यालयाचा विशेष भर असतो. याकरिता भाभा अणुसंशोधन केंद्रातील प्रथितयश निवृत्त वैज्ञानिकांनी महाविद्यालयात येऊन नियमित केलेले मार्गदर्शन, तसेच विविध कंपन्यातील प्रथितयश व्यवस्थापक यांनी केले मार्गदर्शन इत्यादी योजना विद्यार्थ्यांच्या हितासाठी महाविद्यालय राबवत आहे. यामुळेच यावर्षी महाविद्यालयातील १००% विद्यार्थ्यांना प्लेसमेंट मिळविण्यात यश मिळाले. यातील ४५% विद्यार्थ्यांकडे २ नोकरीच्या ऑफर आहेत.

उच्च शिक्षणासाठी कोकण सारख्या ग्रामीण आणि दुर्गम भागात करत असलेल्या ह्या उल्लेखनीय कार्याची दखल घेऊन दिनांक ३० जून २०२३ रोजी झालेल्या **Indian Achievers Awards 2023** या समारंभात **Best Industrial Interface College of The Year** असा पुरस्कार राज्यपाल विधानसभा अध्यक्ष श्री. राहुल नार्वेकर यांच्या शुभहस्ते, प्रसिद्ध सिने–अभिनेता गुलशन ग्रोव्हर, प्रसिद्ध गायक कुमार सानू यांच्या उपस्थितीत मुंबई येथे पार पडलेल्या एका शानदार सोहळ्यात प्रदान करण्यात आला. सदर पुरस्कार महाविद्यालयाच्या वतीने प्राचार्य डॉ. नरेंद्रकुमार सोनी यांनी स्वीकारला.



Posting under the Reg. No. MH/MR/TNC-27/2004-2006



# विद्या प्रसारक मंडळ, ठाणे

- अत्याधुनिक दृक् श्राव्य यंत्रणा
- वातानुकूलित प्रसन्न वातावरण
- वाहने उभी करण्यासाठी प्रशस्त जागा

अशा सुविधांनी युक्त

| सभागृहाचे नाव | ठिकाण | आसन क्षमता |
|---|---|---|
| थोरले बाजीराव पेशवे सभागृह | महाविद्यालय परिसर | ३०० |
| कात्यायन सभागृह | कला/वाणिज्य इमारत | १६० |
| पातंजली सभागृह | बा. ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालय इमारत | १६० |
| पाणिनी सभागृह | डॉ. वा. ना. बेडेकर व्यवस्थापन अभ्यास संस्था इमारत | १८० |
| मनु सभागृह | वि. प्र. मं. चे ठाणे नगरपालिका विधी महाविद्यालय इमारत | २५० |

**❉ संपर्क ❉**

कार्यवाह

**विद्या प्रसारक मंडळ**

विष्णूनगर, नौपाडा, ठाणे - ४०० ६०२

दूरध्वनी क्रमांक - २५४२६२७०

Email : vpmt1935@gmail.com

हे मासिक प्रकाशक आणि संपादक डॉ. विजय वासुदेव बेडेकर व मुद्रक श्री. विलास सांगुर्डेकर, परफेक्ट प्रिण्टस्, नुरीबाबा दर्गा रोड, ठाणे - ४०० ६०१ या मुद्रणालयामध्ये छापून विद्या प्रसारक मंडळ, जिल्हा ठाणे-४०० ६०२ यांच्याकरिता विद्या प्रसारक मंडळ, डॉ. बेडेकर विद्या मंदिर, विष्णूनगर, ठाणे - ४०० ६०२ इथून प्रकाशित केले.